मंगळवार, २८ जून २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक ३४१
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

'ती' सामुदायिक आत्महत्या नसून हत्याकांड/२
रायगड जिल्ह्यातील चार घाट धोकादायक/५
इंग्लंडच्या कसोटी संघातही कोरोनाचा शिरकाव/८

## 'महाराष्ट्रात लवकरच भाजप-शिवसेनेचे सरकार'



**गुवाहाटी :** उद्धव ठाकरेंनी महाविकास आघाडीतून बाहेर पडावे. महाराष्ट्रात लवकरच भाजप-शिवसेनेचे सरकार येईल, असा विश्वास ना. एकनाथ शिंदे समर्थक आमदार दीपक केसरकर यांनी व्यक्त केला आहे. माध्यमांशी बोलताना आमदार केसरकर पुढे म्हणाले की, सध्या १०-१२ आमदार वगळता सर्व आमदार आमच्यासोबत आहेत. आम्ही बाळासाहेबांचे विचार घेऊन पुढे जातोय. आमच्यावर गद्दाराचे आरोप करण्यात आले आहेत. हे कितपत योग्य आहे? बाहेर पडणाऱ्यांची समजूत काढण्याची पद्धत आहे, मात्र इथे समजूत काढताना धमक्या दिल्या जात आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरेंनी काँग्रेस, राष्ट्रवादीची साथ सोडावी. आमदार केसरकर यांनी या वेळी एकनाथ शिंदे हेच शिवसेनेचे गटनेते असल्याचेही स्पष्ट केले.

# बंडखोर आमदारांना 'सर्वोच्च' दिलासा

## विधानसभा उपाध्यक्ष झिरवळांसह चौधरी, प्रभू यांना कोर्टाची नोटीस



### ना. एकनाथ शिंदेंच्या याचिकेवर ११ जुलैला पुढील सुनावणी







**नवी दिल्ली :** वृत्तसंस्था

शिवसेना नेते व मंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात बंडखोरी करणाऱ्या आमदारांना सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे. बंडखोर आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात १२ जुलैपर्यंत कोणतीही कारवाई करू नये, असे आदेश न्यायालयाने ठाकरे सरकारला दिले आहेत. त्याचप्रमाणे विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्यासह शिवसेनेचे गटनेते अजय चौधरी आणि शिवसेनेचे प्रतोद सुनील प्रभू यांना न्यायालयाने नोटीस बजावली आहे. त्यांना पाच दिवसांमध्ये आपली बाजू मांडणारे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, तर या प्रकरणाच्या पुढील सुनावणीसाठी ११ जुलैची तारीख दिली आहे.

ना. एकनाथ शिंदे यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर सोमवारी (दि. २७) सुनावणी झाली. या वेळी न्यायालयाने विधानसभा उपाध्यक्षांनी बंडखोर आमदारांना दिलेल्या अपात्रतेच्या नोटीसला ११ जुलैपर्यंत स्थगिती दिली. या आमदारांना आपले म्हणणे मांडण्यासाठी १२ जुलै सायंकाळी ५.३०पर्यंत वेळ दिली आहे. तोपर्यंत अपात्रतेसंदर्भातील कोणतीही कारवाई करू नये, असा आदेश न्यायालयाने दिला. यामुळे बंडखोर १६ आमदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

याचबरोबर न्यायालयाने विधिमंडळ, शिवसेनेचे प्रतोद आणि बंडखोर शिंदे गट अशा तिन्ही पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्यासाठी नोटीस बजावली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आम्ही निकाल देऊ, असे कोर्टाने सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने शिंदे गटाच्या वकिलांना, तुम्ही उच्च न्यायालयात न जाता इकडे का आलात असे विचारले. त्यावर शिंदे गटाच्या वकिलांनी सांगितले की, २२६चे अस्तित्व कलम ३२ला लागू करण्यासाठी घटनात्मक प्रतिबंध नाही. फ्लोअर टेस्ट, अपात्रता यासारख्या कोणत्याही प्रकरणांबाबत सुप्रीम कोर्टातच येण्याबाबतचे निर्देश आहेत. अल्पसंख्याक मंत्रिमंडळ राज्य यंत्रणेला उद्ध्वस्त करीत आहेत, आमच्या घरांवर हल्ले करीत आहेत, आमचे मृतदेह परत येतील, असे सांगत आहेत. मुंबईत आमचे हक्क बजावण्यासाठी वातावरण अनुकूल नाही.

युक्तीवादादरम्यान बहुमत चाचणीसंदर्भातील प्रश्नही उपस्थित झाला. त्यावर न्यायालयाने जर तरच्या प्रश्नांवर आम्ही कोणतीही हमी देऊ शकत नाही, असे सांगितले. या प्रकरणामध्ये बहुमत चाचणीबाबतचा कोणताही युक्तीवाद न्यायलयासमोर झालेला नाही किंवा ते प्रकरण युक्तीवादासाठी आलेले नाही, असे सांगत न्यायालयाने बहुमत चाचणी रोखण्याचे थेट आदेश दिले नाही.

विशेष म्हणजे न्यायालयाने या वेळी महाराष्ट्र सरकारला ३९ आमदार, त्यांचे कुटुंबीय व मालमत्ता यांची हानी होणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. बंडखोर ३९ आमदारांच्या जीवाची आणि त्यांच्या कुटुंबीयांची सुरक्षा करण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. या संदर्भात राज्य सरकारने खबरदारी घ्यावी आणि या आमदारांच्या घराला आणि कुटुंबाला सुरक्षा पुरवावी, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

न्यायालयाच्या निर्णयानंतर ना. शिंदे यांनी, हा वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा आणि धर्मवीर आनंद दिघेसाहेबांच्या विचारांचा विजय असल्याचे ट्वीट करून म्हटले आहे.

### बंड नव्हे, शिवसेनेच्या आत्मसन्मानाचा लढा!

एकनाथ शिंदे गटाच्या बाजूने असलेले आमदार दीपक केसरकर यांनी पत्रक काढत या आमदारांची भूमिका मांडली आहे. आमचा हा लढा शिवसेनेचा आहे, शिवसेनाप्रमुखांच्या विचारांचा आहे, शिवसेनेच्या अस्तित्त्वाचा आहे, मराठी आणि हिंदुत्वाच्या अस्मितेचा आहे. हे बंड नाही, हा शिवसेनेच्या आत्मसन्मानाचा लढा आहे आणि तो जिंकल्याशिवाय आता माघार नाही. आम्ही शिवसेनेसोबतच आहोत. आम्ही संपणार नाही, आम्ही थांबणार नाही, महाराष्ट्राला पुन्हा नव्या उंचीवर नेल्याशिवाय आता आम्ही माघार घेणार नाही, असे या पत्रकात म्हटले आहे.

## खारघरमधील आंदोलनप्रकरणी शिवसेना पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल

**खारघर :** प्रतिनिधी

राज्यात सुरू असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी आपल्या हद्दीत जमावबंदीचे आदेश लागू केले आहेत, मात्र त्यानंतरदेखील शिवसेनेच्या रायगड जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी बंडखोर शिवसेना नेते व मंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर आमदारांचे खारघर येथे पुतळे जाळून आंदोलन केले. त्यामुळे खारघर पोलिसांनी या आंदोलनाचे नेतृत्व करणारे शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केले आहेत.

शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या वतीने शनिवारी (दि. २५) खारघर बेलपाडा येथील कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस शिवसेना नेते अनंत गीते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, माजी आमदार मनोहर भोईर, शिरीष घरत, बबन पाटील आदी उपस्थित होते. बैठक संपल्यानंतर कार्यालयाच्या बाहेर आलेल्या काही नेते व पदाधिकाऱ्यांनी मंत्री एकनाथ शिंदे, आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे यांच्या पुतळ्यांचे दहन करून निषेध व्यक्त केला.

खारघर पोलिसांनी या आंदोलनाचे नेतृत्व करणारे शिरीष घरत व त्यांच्यासोबत बबन पाटील, मनोहर भोईर, गुरूनाथ पाटील, शंकर पाटील, प्रकाश गायकवाड, परेश पाटील, यतीन देशमुख, अनिल पाटील, दीपक घरत यांच्यासह ४० ते ५० पदाधिकाऱ्यांवर मनाई आदेशाचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## भाजपचे वेट अ‍ॅण्ड वॉच!

**मुंबई :** प्रतिनिधी

दिवसभरातील एकूण घडामोडींनंतर राज्याच विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर पक्षाच्या कोअर कमिटीची एक महत्त्वाची बैठक झाली. भाजप वेट अ‍ॅण्ड वॉचच्या भूमिकेत आहे, असे भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी या बैठकीनंतर स्पष्ट केले.

एकनाथ शिंदे यांच्याकडून भाजपला कोणताही प्रस्ताव आलेला नाही. अविश्वासाचा प्रस्ताव आणण्याची गरज आताच्या घडीला आहे, असे वाटत नाही, असे भाजप नेते मुनगंटीवार म्हणाले.

### पत्राचाळ जमीन घोटाळा प्रकरण

## संजय राऊत यांना ईडीचे समन्स; आज चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश

**मुंबई :** प्रतिनिधी



मंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे शिवसेनेसह महाविकास आघाडी सरकारला मोठा हादरा बसला असताना आता मविआतील आणखी एक नेते अडचणीत आले आहेत. पत्राचाळ जमीन खरेदी घोटाळाप्रकरणी शिवसेना खासदार संजय राऊत यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) समन्स बजावले आहे. राऊत यांना मंगळवारी (दि. २८) चौकशीला हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मुंबईतील एक हजार ३९ कोटींच्या पत्राचाळ घोटाळाप्रकरणी शिवसेना खासदार संजय राऊत यांचे निकटवर्तीय प्रवीण राऊत यांची चौकशी होऊन त्यांना अटक करण्यात आली होती. या घोटाळ्यातील पैसा अलिबागमधील मालमत्ता खरेदी करण्यासाठी वापरण्यात आल्याचा संशय ईडीला आहे. याच चौकशीसाठी खासदार राऊत यांना ईडीने समन्स पाठवले आहे. मंगळवारी सकाळी ११ वाजता मुंबईतील ईडीच्या कार्यालयात राऊत यांना उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## निवडक

### अयोध्येत आढळले बॉम्ब; सुरक्षा यंत्रणा सतर्क

**लखनऊ :** अयोध्येतील कँट परिसरात निर्मलीकुंड येथील रस्त्याच्या कडेला असलेल्या झुडपात सोमवारी (दि. २७) १८ हातबॉम्ब (हँड ग्रेनेड) आढळले. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. हा परिसर लष्कराच्या फायरिंग रेंजपासून काही अंतरावर आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून परिसरात पाळत वाढवण्यात आली आहे. दरम्यान, सर्व बॉम्ब नष्ट करण्यात आले आहेत.



### अजित पवार, भुजबळ यांना कोरोनाची लागण

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार आणि अन्न व पुरवठामंत्री छगन भुजबळ यांना कोरोनाची लागण झाली आहे. या दोघांनी स्वतः ट्वीट करीत ही माहिती दिली. या ट्वीटमध्ये त्यांनी आपल्या संपर्कात आलेल्यांनी काळजी घेण्याचे तसेच लक्षणे दिसल्यास तत्काळ कोरोना चाचणी करण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, याआधी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनाही कोरोना संसर्ग झाला होता.








**पनवेल :** भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठच्या वतीने आयोजित कर्मयोगी नमो लघुपट स्पर्धेत पनवेल तालुक्यातील तीन संस्थांच्या लघुपटांना पारितोषिक मिळाले आहे. या विजेत्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठचे कोकण विभाग सहसंयोजक दीपक पवार, अक्षय्या चितळे, प्रदेश सदस्य सुनील सिन्हा, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, सहसंयोजक गणेश जगताप, पनवेल शहर संयोजक निखिल गोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### मद्यप्राशन करणे बेतले जीवावर

## मोरबे धरणात बुडून मुंबईच्या युवकाचा मृत्यू

**खालापूर :** प्रतिनिधी



मद्यप्राशन करून खालापूर तालुक्यातील चौक येथील मोरबे धरणात उतरलेल्या ग्रुपमधील एका युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. वैभव रामचंद्र गवांदे (वय २२, रा. साकीनाका, मुंबई) असे या मयत तरुणाचे नाव असून त्याचा मृतदेह सोमवारी (दि. २७) पाण्याबाहेर काढण्यात आला.


मिळालेल्या माहितीनुसार मुंबईतील साकीनाका-कुर्ला येथील आठ युवक खालापुरातील चौक येथे असणाऱ्या मोरबे धरणावर रविवारी पिकनिकसाठी आले होते. धरणाच्या किनारी या तरुणांनी मद्यप्राशन केले आणि ते पाण्यात पोहण्यासाठी उतरले. धरणाच्या पाण्याची पातळी खाली गेली असल्याने हे तरुण किनाऱ्यापासून सुमारे एक किमी अंतरावर पोहत गेले, मात्र या वेळी खोल पाण्याचा अंदाज न आल्याने वैभव गवांदे हा पाण्यात बुडाला आणि खाली चिखल व कपारीत अडकून पडला.

वैभव बाहेर न आल्याने घाबरलेल्या त्याच्या मित्रांनी थेट मुंबई गाठली. यामध्ये वैभवचा भाऊही होता, परंतु त्याला याची खंत जाणवू लागल्याने झालेली हकिकत त्याने आपल्या कुटुंबाला सांगितली. त्यानंतर नातेवाइकांनी कुर्ला पोलीस ठाण्यात याबाबत खबर दिली. तिथून ही घटना कळताच खालापूर पोलीस ठाणे अंतर्गत चौक दूरक्षेत्राचे सहाय्यक निरीक्षक सूर्यवंशी यांनी अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी असलेल्या ग्रुपचे अभिजित घरत व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने वैभवचा मृतदेह सोमवारी सकाळी पाण्यातून बाहेर काढला.

रायगड जिल्ह्यात धरणक्षेत्र, धबधबे अशा पावसाळी पर्यटनस्थळांवर जाण्यास प्रशासनाने बंदी घातली आहे. असे असूनही काही अतिउत्साही पर्यटक आदेशाचे उल्लंघन करीत जीव धोक्यात घालत असल्याचे समोर येत आहे. मागील आठवड्यात २० जून रोजी खालापुरातील कलोते धरणात बुडून कर्नाटक कारवार येथील आकाश नाईक (वय २६) हा तरुण बुडाला होता, तर मागील वर्षी खालापूर तालुक्यातील विविध धरण व परिसरात एकूण पाच जण बुडाल्याच्या घटना घडल्या आहेत.

## अग्निपथ योजना : हवाई दलातील भरतीला तरुणांचा मोठा प्रतिसाद

**नवी दिल्ली :** वृत्तसंस्था



केंद्र सरकारने जाहीर केलेल्या अग्निपथ योजनेंतर्गत भारतीय हवाई दल विभागाने भरती प्रक्रियेला सुरुवात केली आहे. तरुणांचा या भरतीला मोठा प्रतिसाद असून अवघ्या तीन दिवसांमध्ये ५६ हजारांपेक्षा अधिक अर्ज दाखल झाले आहेत.

अग्निपथ योजनेंतर्गत हवाई दलाकडून २४ जून रोजी अधिसूचना जारी करण्यात आली होती. त्यानुसार हवाई दलात नोंदणी प्रक्रियेला सुरुवात झाली असून अर्ज करण्याची शेवटची तारीख ५ जुलै आहे. भरतीसाठी इच्छुक असणाऱ्या युवकांना careerindianairforce.cdac.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन हवाई दलाकडून करण्यात आले आहे.

अग्निपथ योजनेंतर्गत १७ ते २१ वर्षांच्या तरुणांना चार वर्षे भारतीय लष्करात दाखल केले जाणार आहे. चार वर्षांनंतर २५ टक्के अग्निविरांना सेवेत नियमित केले जाईल, तर चार वर्षांच्या सेवेनंतर बाहेर पडणाऱ्या अग्निवीरांना केंद्रीय सशस्त्र दल तसेच आसाम रायफल्समध्ये प्राथमिकता दिली जाणार आहे. भाजपशासित उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशसारख्या राज्यांनी अग्निवीरांना राज्य पोलीस दलात प्राधान्य दिले जाईल, असे स्पष्ट केले आहे. याशिवाय उद्योजकांनीदेखील अग्निवीरांना नोकरीत प्राधान्य देण्याची घोषणा केली आहे.







**जेजुरी :** आषाढी एकादशी सोहळ्यासाठी पंढरपूर येथे निघालेल्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे रविवारी जेजुरीत आगमन झाले. या वेळी ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. पनवेलतर्फे वारकरी बांधवांना मोफत पाणी व बिस्कीट वाटप करण्यात आले.

# आमदारांना धमक्या देणे गुन्हा नाही का?

## ■ केंद्रीय मंत्री नारायण राणे यांची संजय राऊतांवर टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या राज्यात सत्तास्थापनेवरून शिंदे सतर्थक व ठाकरे सरकारमध्ये संघर्ष सुरू आहे. त्या पार्श्वभूमिवर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदेंसह बंड पुकारलेल्या ४०हून अधिक आमदारांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. गुवाहाटीत जे ४० लोक आहेत ती जिवंत प्रेते आहेत. त्यांच्या बॉड्या इकडे येणार आहेत. इथे जी आग पेटली आहे, त्यात काय होऊ शकते हे त्यांना माहित आहे, त्यामुळे ते लटपटत आहेत. ते ४० लोक जेव्हा उतरतील तेव्हा ते मनाने जिवंत नसतील, अशा शब्दांत संजय राऊत यांनी बंडखोर शिवसेना आमदारांवर जहरी टीका केली. यावरून आता केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी शिवसेनेवर जोरदार निशाणा साधला आहे.



शिवसेनेची सत्ता गेल्यात जमा आहे, असे म्हणत हल्लाबोल केला आहे. गुवाहाटीतील हॉटेलमधून बंडखोरांची प्रेतं बाहेर पडतील, अशा धमक्या देणे हा गुन्हा होत नाही का? असा सवाल राणेंनी विचारला आहे. नारायण राणे यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत एक ट्विट केले आहे. शिवसेनेची सत्ता गेल्यात जमा, युवराजांनी धमक्या देणे बंद करावे. अंगावरचे मच्छर मारता येत नाहीत अशांच्या गुवाहाटीतील हॉटेलमधून बंडखोरांची प्रेतं बाहेर पडतील, अशा वल्गनांवर कोण विश्वास ठेवेल? अशा धमक्या देणे हा गुन्हा होत नाही का? असे राणे यांनी म्हटले आहे.

एकनाथ शिंदे यांच्या बंडाने महाराष्ट्रातील राजकारण ढवळून निघाले आहे. अडीच वर्षांपूर्वी फसवणूक झाल्याचे ते कबूल करतात. वारंवार अपमानास्पद वागणूक एकनाथ शिंदे यांना देण्यात आली. त्यातून त्यांनी बंड केले. बाळासाहेबांनी शिवसेना पक्ष वाढवला, शिवसैनिकांवर प्रेम केले, पण पक्षप्रमुख, मुख्यमंत्री असूनही सहकाऱ्यांना विश्वास देता आला नाही. शिवसैनिकांना भेटीगाठी दिल्या नाहीत. मातोश्रीच्या बाहेर पडायचं नाही. त्यामुळे गुदमरलेल्या मंत्री, आमदारांनी त्यागाच्या भूमिकेवरून हा बंड आहे, असे सांगितले होते.

# ठाण्यात शिंदे समर्थकांनी जाळला संजय राऊतांचा पुतळा

**ठाणे : प्रतिनिधी**

शिवसेना नेते एकनाथ शिंदेच्या बंडानंतर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकनाथ शिंदे विरुद्ध ठाकरे परिवार असा संघर्ष सुरू झाला आहे. या पार्श्वभूमिवर शिवसेना खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे व त्यांच्यासह गुवाहाटीमध्ये असलेल्या आमदारांबाबत केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे ठाणे महानगरपालिकेच्या मुख्यालयासमोर संजय राऊत यांचा पुतळा जाळून सोमवारी (दि. २७) निषेध व्यक्त केला.



एकनाथ शिंदे यांचे समर्थकांनी हा संयम बाळगून ठेवला होता, परंतु सोमवारी एकनाथ शिंदे यांचे भाऊ प्रकाश शिंदे यांच्या मार्गदर्शनाने ठाण्यामध्ये टेंभी नाका परिसरामध्ये शिंदे समर्थक कार्यकर्त्यांनी शक्तीप्रदर्शन केले. संजय राऊत यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे संतापलेल्या कार्यकर्त्यांनी संजय राऊत यांचा पुतळा जाळून आमच्या संयमाचा अजून अंत बघू नका, असा इशारा दिला. त्यानंतर शक्तीस्थळावर खासदार श्रीकांत शिंदे व शिंदे समर्थकांनी धर्मवीर आनंद दिघे यांच्या समाधीला आदरांजली वाहिली.

### सांगली सामूहिक आत्महत्या प्रकरण

## आत्महत्या नाही, तर हत्या; दोन संशयित अटकेत

**सांगली : प्रतिनिधी**

सांगलीतल्या मिरज तालुक्यातल्या म्हैसाळ इथे एकाच कुटूंबातील नऊ जणांनी आत्महत्या केल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता, पण आता या घटनेला धक्कादायक वळण आले आहे. या आत्महत्या नसून हत्या असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

जेवणात विषारी पदार्थ मिसळून या नऊ जणांची हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी दोन संशयितांना पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी खूनाचा गुन्हा दाखल करण्यात येणार असून यामागे नेमके कारण शोधण्याचे काम पोलीस करीत आहेत. अब्बास महंद बागवान आणि धीर चंद्रकांत सरवशे अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहे. सांगलीचे पोलीस अधीक्षक दीश्रित गेडाम यांनी ही माहिती दिली आहे.

मृतांमध्ये पोपट यल्लाप्पा वनमोरे (वय ५२), संगीता पोपट वनमोरे (वय ४८), अर्चना पोपट वनमोरे (वय ३०), शुभम पोपट वनमोरे (वय २८), माणिक यल्लाप्पा वनमोरे (वय ४९), रेखा माणिक वनमोरे (वय ४५), आदित्य माणिक वनमोरे (वय १५) अनिता माणिक वनमोरे (वय २८) आणि अक्कताई वनमोरे (वय ७२) या नऊ जणांचा समावेश आहे.

# जाचक ड्युटी शेड्युलला भाजप बेस्ट कामगार संघाचा विरोध

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप बेस्ट कामगार संघाने सोमवारी (दि. २७) बेस्टचे महाव्यवस्थापक सुरेश चंद्र यांची कुलाबा येथे भेट घेऊन जाचक ड्युटी शेड्युल रद्द करण्याची मागणी केली.

सरचिटणीस गजानन नागे व ज्येष्ठ बेस्ट कमिटी सदस्य व कामगार आघाडीचे मुंबई अध्यक्ष सुनील गणाचार्य यांच्यासमवेत असंख्य भाजप बेस्ट कामगार संघाचे उपाध्यक्ष चिटणीस व कर्मचारी यांनी सोमवारी बेस्टचे महाव्यवस्थापक सुरेश चंद्र यांची कुलाबा येथे भेट घेतली व त्यांना याबाबत निवेदन दिले.

या वेळी भाजप बेस्ट कामगार संघाचे उपाध्यक्ष आनंदा जरग, बबन बारगजे, विजय माळवे, काटकर, चिटणीस राजकुमार घार्गे, विविध डेपोचे अध्यक्ष, सरचिटणीस, विभागीय चिटणीस उपस्थित होते.



# पीओपी बंदीविरोधातील याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात प्लास्टिक ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेश व देवीच्या मूर्ती बनवण्यावर आणि त्या वापरण्यावर बंदी घालणाऱ्या नव्या मार्गदर्शक तत्त्वांच्या वैधतेला आव्हान देणारी जनहित याचिका उच्च न्यायालयाने सोमवारी (दि. २७) फेटाळली.

पीओपीच्या मूर्तीमुळे जलप्रदूषण होत असल्याच्या कारणास्तव केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०१०मध्ये पीओपीचा वापर करू नये याबाबत मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली होती. त्यानंतर २०२०मध्ये सुधारित मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करण्यात आली, तसेच गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात प्लास्टिक ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनवण्यावर आणि त्या वापरण्यावर बंदी घालण्यात आली, मात्र शाडू माती पीओपीपेक्षा पर्यावरणासाठी घातक आहे. कोणताही शास्त्रशुद्ध अभ्यास न करता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पीओपी बंदीचा निर्णय घेतला आहे. शिवाय बंदी मार्गदर्शक तत्त्वांद्वारे कशी काय घातली जाऊ शकते? असा प्रश्न याचिकाकर्त्यांचे वकील संजय गुंजकर यांनी उपस्थित केला.

हा निर्णय शास्त्रशुद्ध अभ्यासाअंती घेण्यात आल्याचे प्रदूषण मंडळाचे वकील प्रणव ठाकूर यांनी न्यायालयाला सांगितले. हे प्रकरण उच्च न्यायालयाने गेल्यावर्षी फेब्रुवारी महिन्यात राष्ट्रीय हरित लवादाकडे पाठवले होते. हरित लवादाने बंदीचा निर्णय योग्य ठरवला होता. त्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयानेही एनजीटीचा निर्णय योग्य ठरवला होता. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने एकदा स्पष्ट केलेले असताना आपण हे प्रकरण नव्याने ऐकू शकत नाही, असे स्पष्ट करून मुख्य न्यायामूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने याचिका फेटाळली.

# मोतीबिंदू चिकित्सा शस्त्रक्रिया शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजपच्या वतीने प्रभाग क्र. ३२ शिरवणे येथे नागरिकांसाठी मोतीबिंदू चिकित्सा आणि शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पनवेल येथील लक्ष्मी आय इन्स्टिट्यूटचे डॉ. सुहास हळदीपुरकर यांच्या सहकार्याने शिरवणेत झालेल्या या शिबिरात २०० हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला. शिबिराचा शुभारंभ माजी महापौर जयवंत सुतार यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी बोलताना नवी मुंबई भाजपचे महामंत्री डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले की, सामाजिक बांधिलकीतून या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया अल्पदरात व आर्थिक परिस्थिती कमकुवत असणाऱ्यांवर मोफत करण्यात आल्या. शिबिरासाठी माजी नगरसेवक काशिनाथ पाटील, भाजप नवी मुंबई महामंत्री डॉ. राजेश पाटील, माजी नगरसेविका माधुरी सुतार, ओबीसी सेलचे प्रदेश सचिव राजेश पाटील, मंडल अध्यक्ष अशोक चॅटर्जी, सामाजिक कार्यकर्त्या निर्मला जयवंत सुतार, प्रभाकर ठाकूर, दीपेश पाटील, विजय नाईक उपस्थित होते.




# कोप्रोली येथे डेंटल क्लिनिकचे उद्घाटन

**उरण : बातमीदार**

दातांच्या आरोग्याचे तज्ज्ञ, रूट कॅनल स्पेशालिस्ट व ईम्प्लान्टोलॉजिस्ट डॉ. शुद्धोधन गायकवाड यांनी उरण तालुक्यामध्ये कोप्रोली चौक येथे प्रथमच अत्याधुनिक डेंटल क्लिनिक सुरू केले. त्याचे उद्घाटन रविवारी (दि. २६) करण्यात आले.



या वेळी महाराष्ट्र राज्य भाजपचे सरचिटणीस अश्विन आगमनकर, भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष विकी पाटील, ट्रान्सपोर्ट सेलचे उरण तालुकाध्यक्ष सुदेश पाटील, भाजप गाव अध्यक्ष अभय पाटील, सामाजिक कार्यकर्ते दिलीप उदूगडे निवेदक सुनिल वर्तक आदींनी क्लिनिकला भेट देऊन डॉ. शुद्धोधन गायकवाड, डॉ. मृणाली डुबल, डॉ. राधिका धलवार, डॉ. आकांक्षा भोळे, डेंटल असिस्टंट जागृती वशेणिकर यांना शुभेच्छा दिल्या.

# एचएससी व एसएससी विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन

**उरण : बातमीदार**

एचएससी व एसएससीच्या विद्यार्थ्यांना भविष्यातील नोकरी, व्यवसायाच्या संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून सोमवारी (दि. २७) कोकण ज्ञानपीठचे वाणिज्य व कला महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन शिबिर झाले. प्रा. डॉ. एच. के. जगताप यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.



या वेळी प्राचार्य बळीराम गायकवाड, माजी प्राचार्य के. ए. शामा, ज्येष्ठ प्रा. एस. इंदुलकर, डॉ. प्रा. दत्ता हिंगमिरे, डॉ. प्रा. पराग कारूळकर, प्रा. आर. टी. थावडे, प्रा. अरुण चव्हाण, डॉ. प्रा. एम. जी. लोणे, प्रा. ए. के. गायकवाड, भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे जिल्हा उपाध्यक्ष विकी पाटील उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे, सदस्य सुनिल वर्तक, गणेश म्हात्रे, सुमित कोळी, नमित कोळी, विवेक कोळी, हेमंत ठाकूर संस्थेच्या आदी पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

## कोकणात अद्यापही अत्यल्प पाऊस

**नवी मुंबई : बातमीदार**

कोकण विभागात सोमवारी (दि. २७) केवळ ३४.९ मिमी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७८.० मिमी. झाली आहे.

जून महिना संपत आला तरी अजूनही म्हणावा तसा पावसाला जोर आलेला नाही. त्यामुळे बळीराजासह सामान्य नागरिकही हैराण झाले आहेत. जिल्हानिहाय पावसाची आकडेवारी ठाणे २.५ मिमी., पालघर ०.१ मिमी, रायगड १८.७ मिमी., रत्नागिरी ५५.४ मिमी, सिंधुदुर्ग ७८.० मिमी. पाऊस पडला आहे.

## मुंबईत बीए ४ आणि बीए ५चे आणखी पाच रुग्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत बीए ४ आणि बीए ५च्या नवीन पाच रुग्णांची नोंद रविवारी झाली. ओमायक्रॉनच्या या नव्या उपप्रकाराने बाधित रुग्णांची संख्या मुंबईत ३३, तर राज्यभरात ५४ झाली आहे.

पुण्यातील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या जनुकीय अहवालामध्ये मुंबईत बीए ४चे दोन, तर बीए ५चे तीन रुग्ण आढळले आहेत. या रुग्णांना १० ते २० जून या काळात करोनाची बाधा झाली होती. सर्वात जास्त म्हणजे तीन रुग्ण हे २६ ते ५० वयोगटातील आहेत, तर ५० वर्षांवरील एका आणि १८ वयोगटातील एका रुग्णाचा समावेश आहे. रुग्णांमध्ये तीन पुरुष आणि दोन स्त्रिया आहेत.

१२ ते १४ वयोगटातील मुलांना कोबरेव्हॅक्स ही लस दिली जाते. २८ दिवसांच्या अंतराने दुसरी मात्रा दिली जाते. आतापर्यंत अंदाजे दोन लाख मुलांना ही लस देण्यात आली. त्यापैकी ६७ हजार मुलांना दोन्ही मात्रा पूर्ण केल्या आहेत, तर एक लाख ३४ हजार मुलांनी पहिली मात्रा घेतली आहे.

# आनंद दिघे महाविद्यालयात ४० विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश


**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील बिरवाडी येथील धर्मवीर आनंद दिघे महाविद्यालयात मराठा समाजातील ४० विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देण्यात आला आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते तेजस सुधीर भोसले यांनी याकरिता विशेष प्रयत्न केले.

महाड बिरवाडी येथील धर्मवीर आनंद दिघे महाविद्यालयात मराठा समाजातील विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यकर्ते तेजस भोसले यांच्या प्रयत्नाने मोफत प्रवेश देण्यात आला. मराठा समाजातील अल्प उत्पन्न गटातील पाल्यांना आपल्या मुलांना पैशाअभावी शिक्षणापासून वंचित ठेवण्याची वेळ येते. यामुळे सदर विद्यालयाने खातरजमा करून अत्यल्प गटातील पाल्यांच्या मुलांना मोफत प्रवेश देण्यात यावा अशी मागणी तेजस भोसले यांनी केली होती. त्यानुसार या शैक्षणिक वर्षात धर्मवीर आनंद दिघे विद्यालयात या शिक्षण संस्थेचे चेअरमन राजेंद्र केंद्रे यांनी या मागणीची गांभीर्याने दखल घेत इयत्ता ११वी आणि १२वी शाखेत वाणिज्य, विज्ञान आणि वाणिज्य शाखेत १० मुले-मुली अशा जवळपास ४० विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देण्यात येणार असल्याचे सांगितले.



सामाजिक कार्यकर्ते तेजस भोसले यांनी बिरवाडी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश मिळावा, अशी मागणी केली होती. त्याला प्रतिसाद देत या महाविद्यालयाने मोफत प्रवेश दिल्याचे त्यांनी सांगितले.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
मंगळवार, दि. २८ जून २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# नागरी समस्यांबाबत भाजपची तत्परता

## कळंबोलीतील उघड्या गटारांना झाकणे बसविण्याची मागणी

### सभापती प्रमिला पाटील यांचे सिडकोला निवेदन

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीमधील उघड्या गटारांना झाकण लावण्यात यावी, अशी मागणी करीत पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती 'ब'च्या सभापती प्रमिला पाटील यांनी सिडकोच्या अभियंताकडे निवेदन दिले.

कळंबोली हे सिडकोने वसविलेले शहर आहे. आता या शहरांमधील नागरी सुविधांची वानवा झालेली दिसून येत आहे. येथील रस्ते, गटारे, उद्याने तसेच आवश्यक सोयीसुविधांची दुरवस्था झालेली असून यामुळे दुर्घटना होण्याची शक्यता आहे. म्हणूनच नागरिकांच्या समस्या सिडकोने सोडवाव्यात, यासाठी निवेदन देण्यात आले आहे.

कळंबोलीमधल्या उघड्या गटारांचे झाकण लावण्यात यावे, कारण अशा धोकादायक गटारांमुळे पावसाळ्यामध्ये दुर्घटना घडू शकते व त्यास पूर्णपणे सिडको प्रशासन जबाबदार असेल. केएल ४ सेक्टर ४ ई मोरेश्वर सोसायटीचा सांडपाणीचा निचरा झाला पाहिजे. रोडवरील सेंट्रल ड्रेनेज लाईनचा चोकअप काढण्याबाबतही सिडको अभियंताकडे निवेदन देण्यात आहे, असे सभापती प्रमिला पाटील यांनी सांगितले.

निवेदन देतेवेळी भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, सरचिटणीस दिलीप बिस्ट, प्रभाग अध्यक्ष प्रकाश शेलार, विलास किटे व मच्छींद्र कुरुंग आदी उपस्थित होते.



## स्मशानभूमीत पत्रा शेड बसवावी; भाजप नेते प्रभाकर घरत यांची मागणी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

बेलपाडा गावातील स्मशानभूमीत पत्रा शेड टाकून देण्यात यावे, अशी मागणी भाजप नेते प्रभाकर घरत यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पनवेल महापालिकेच्या संबंधित विभागाला निवेदन दिले आहे.



घरत यांनी निवेदनात म्हटले की, बेलपाडा गावातील स्मशानभूमीत अग्नी संस्कारासाठी आणलेले मृतदेह ठेवण्यासाठी जो कट्टा बांधलेला आहे. त्याच्यावर पत्रा शेड टाकून देण्यात यावी. कारण पावसाळ्यात तेथे गैरसोय होते. पाऊस चालू असताना मृतदेह ठेवता येत नाहीत व त्यांच्या नातेवाइकांना खूप त्रास होतो. जर आपण तेथे पत्रा शेड टाकून दिला तर त्यांना योग्य प्रकारे सगळ्या विधी करता येतील. पत्राशेड लवकरात लवकर टाकून द्यावे.

# करंजाडेतील पाणीप्रश्नी भाजपने वेधले सिडकोचे लक्ष

- पाणीपुरवठा सुरळीत करण्याची आग्रही मागणी
- आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे पाणीप्रश्नावर पूर्वनियोजित बैठक सोमवारी (दि. २७) भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजप मध्यवर्ती कार्यालयात झाली.

या बैठकीत करंजाडेमधील पाणी प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या शहरास १५ एमएलडी मागणीच्या तुलनेत ५० टक्के पाणीकपात होत असल्याने सद्यस्थितीत सरासरी सात-आठ एमएलडी पाणीपुरवठा होत असल्याचे सांगण्यात आले. पाणीपुरवठा पूर्ववत करण्याच्या दृष्टीने सिडकोला सांगण्यात आले असून या आठवड्यात सिडको सहव्यवस्थापकीय संचालक, अधीक्षक अभियंता पाणीपुरवठा विभाग यांच्यासह उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात येणार आहे. एमजेपी व सिडकोच्या समन्वयातून पाणीपुरवठा १५ एमएलडीपर्यंत करण्याचे प्रयत्न असल्याचे सांगण्यात आले.

करंजाडे शहराच्या मागच्याबाजूने असलेल्या एमजेपीच्या जलवाहिणीतून लवकरच करंजाडे शहरास पाणीपुरवठा सुरू करण्यात येणार असल्याची माहितीसुद्धा या वेळी देण्यात आली. सेक्टर-६ करिता नव्याने तयार करण्यात आलेल्या जलवाहिनीतून उद्यापासून पाणीपुरवठा सुरू करण्यात असल्याचे सांगितले गेले. सेक्टर ६मधील उंचावर असलेल्या सोसायट्यांना पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत टँकरद्वारे पाणीपुरवठा करणार असल्याचे सिडको अधिकाऱ्यांनी मान्य केले.

या बैठकीला भाजप जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, सिडको पाणीपुरवठा कार्यकारी अभियंते श्री. चौथानी, श्री. गायकवाड, पाणीपुरवठा अभियंते श्री. जगदाळे यांच्यासह भाजप वडघर विभागीय अध्यक्ष समीर केणी, करंजाडे शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे, युवा नेते अतिश साबळे, शहर उपाध्यक्ष दिनेश धामनस्कर, शहर उपाध्यक्ष नरेश दिवेकर, महिला कार्यकर्त्या वैशाली जगदाळे, पराग बने, संतोष मौर्या, सचिन गोरड, रमेश राठोड, गोपाल काळे आदी उपस्थित होते.



## खड्ड्यामुळे अपघातात एकाचा बळी; भाजप नगरसेवकाने घेतली दखल

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर ४ निफ्ट महाविद्यालयाजवळ वळणावर एका सेवानिवृत्त मेजरचा दुचाकी अपघातामध्ये मृत्यू झाला. मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव रोनाल्ड गोम्स (वय ६६) असे आहे. अपघाताची दखल घेत भाजप नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे यांनी सिडकोकडून खड्डा झालेल्या चेंबरचे काम करून घेतले.

खारघर वसाहतीतील काही सेक्टरमध्ये सिडकोकडून डांबरीकरण करण्यात आले होते; मात्र डांबरीकरण करताना मॅनहोलचा भाग तसाच सोडण्यात आला होता. सेक्टर १४ मधील रघुनाथ विहारमध्ये वास्तव्य करणारे निवृत्त मेजर रोनाल्ड गोम्स हे शुक्रवारी कामानिमित्त जात असताना निफ्ट महाविद्यालयालगत रस्त्यावर असलेल्या खड्ड्यात त्यांची दुचाकी अडकली. दुचाकी काढताना ते थेट दुभाजकाला धडकले आणि त्यांच्या मानेला गंभीर दुखापत झाली. उपचारामध्ये त्यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, या अपघाताची दखल पनवेल महानगरपालिका प्रभाग ५चे नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे यांनी घेतली. ही बाब त्यांनी सिडको अधिकाऱ्यांना दाखवून सेक्टर ३ व ४ मधील रस्त्यांवरील टेलिफोन केबल चेंबरची उंची वाढविण्याची सूचना सिडको अधिकाऱ्यांना देऊन वरील चेंबरचे काम करून घेतले. येत्या पाच दिवसांत सेक्टर तीन व चारमधील सर्व चेंबर हे रस्त्याच्या समपातळीत केले जाईल, असे आश्वासन या वेळी सिडको अधिकाऱ्यांनी दिले.



## तोतया पोलिसाने ज्येष्ठ नागरिकाला लुबाडले

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करून एका ७० वर्षीय जेष्ठ नागरिकाची सात ग्राम वजनाची सोनसाखळी चोरल्याची घटना भाजी मार्केटमध्ये घडली आहे.

पनवेल शहर पोलिसांनी या प्रकरणातील तोतया पोलिसांविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. सुकीर भोईर (वय ७०) हे धाकटा खांदा येथील रहिवासी असून ते पनवेल येथील वीजबिल भरण्यासाठी गेले होते. भोईर हे भाजी मार्केटजवळ आले असताना एका व्यक्तीने त्यांना पोलीस असल्याची बतावणी करून थांबवले. त्यानंतर त्याने पुढे पोलीस तपास सुरू असल्याचे सांगून अंगावरील दागिने कागदात बांधून ठेवण्यास भोईर यांना सांगितले, या वेळी भोईर यांनी आपल्या गळ्यातील सोनसाखळी काढताना चोरट्याने हातचलाखीने ती चोरली. या प्रकरणी भोईर यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

## निवडक

### पळस्पे फाटा येथे दुचाकीला आग

**पनवेल :** एका दुचाकीला आग लागल्याची घटना पनवेल जवळील पळस्पे फाटा येथे घडली आहे. पळस्पे फाटा येथे साई ओल्ड सिटीजवळ एका दुचाकीला अचानकपणे आग लागल्याने त्यात दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

### प्रवाशाचा मोबाइल चोरणारा ताब्यात

**पनवेल :** कामोठे येथील एका व्यक्तीचा मोबाइल चोरणाऱ्या सराईत मोबाइल चोरट्यास फलाटावरील प्रवाशांनी पकडून त्यास पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. कामोठे येथे राहणाऱ्या स्वप्नील जाधव यांच्यासोबत हा प्रकार घडला आहे. तो नेरूळ येथे बहिणीकडे आला असता तिथून रेल्वेने मुंबईला चालला होता. या वेळी तो नेरूळ स्थानकात मुंबईकडे जाणाऱ्या लोकलमध्ये दरवाजात उभा होता. लोकल सुरू होताच एका तरुणाने त्याच्या हातातील मोबाइल हिसकावून पळ काढला. या वेळी जाधव याने आरडा-ओरडा करताच नागरिकांनी चोरट्याला पकडून रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिले. त्याचे इम्रान मोहम्मद आझाद शेरानी (वय २८) असे असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### पनवेलमधून एक जण बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक व्यक्ती उलव्याच्या दिशेने निघून गेला. तो अद्याप घरी न परतल्याने ते हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. लक्ष्मण विठ्ठल पाटील (वय ५२) असे त्यांचे नाव असून त्याची उंची साडे पाच फूट, रंग सावळा, डोक्याचे केस काळे-पांढरे, अंगाने माध्यम असून त्यांच्या अंगात पांढरा शर्ट व काळी पॅन्ट घातलेली आहे. त्यांनी पायात पांढरी चप्पल घातली असून त्यांना मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस नाईक नितीन आखाडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### एटीएम कार्डचे क्लोनिंग करून लुबाडले

**पनवेल :** एसबीआय बँकेचे एटीएम कार्डचे क्लोनिंग करून क्लोन केलेल्या एटीएम कार्डच्या सहाय्याने बँकेच्या खात्यातून ५७,५२३ रुपये एवढी रक्कम लबाडीने काढून घेतल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे. हनुमंत काळभोर (वय ६६) यांचे एसबीआय बँकेचे एटीएम कार्डचे क्लोनिंग करून क्लोन केलेल्या एटीएम कार्डच्या सहाय्याने बँकेच्या खात्यातून ५७,५२३ रुपये एवढी रक्कम लबाडीने अज्ञात व्यक्तीने काढून घेतल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे मोफत वह्यावाटप

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती





पनवेल : भाजप युवा मोर्चाचे खारघर तळोजा उपाध्यक्ष शुभ पाटील याला वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी नगरसेवक प्रवीण पाटील, रामजी बेरा, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, चिटणीस गीता चौधरी, पप्पू खामकर आदी उपस्थित होते.

**खारघर : रामप्रहर वृत्त**

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने व भाजप युवा मोर्चाचे खारघर तळोजा उपाध्यक्ष शुभ पाटील याच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खारघर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत वह्या वाटपाचा कार्यक्रम सोमवारी (दि. २७) आयोजित करण्यात आला होता. या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरूणशेठ भगत ह्यांनी वह्यांचे वाटप करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात शुभ पाटील याला उपस्थितांकडून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी भाजप ओबीसी मोर्चाचे सरचिटणीस दशरथ म्हात्रे, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक प्रवीण पाटील, रायगड जिल्हा चिटणीस गीता चौधरी, खारघर युवा मोर्च्या अध्यक्ष विनोद घरत, सोशल मीडिया सहसंयोजिका मोना अडवाणी, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर, भाजप खारघर मंडळ चिटणीस सचिन वास्कर, महिला मोर्चा चिटणीस अंकिता वारंग, ज्येष्ठ नेते सोमनाथ पाटील, ज्येष्ठ नागरिक सेल संयोजक नवनीत मारू, खारघर युवा मोर्चा चिटणीस फुलाजी ठाकूर, पप्पू खामकर, भाजप कार्यकर्ते महेश भोईर, शोभा लवटे, विनोद खानावकर, शाळेच्या प्राचार्य श्री. चौधरी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेलमध्ये महापौर सहाय्यता निधीचे गरजूंना वाटप

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

महापौर सहाय्यता निधीतून पनवेलमध्ये तीन लाभार्थ्यांना सोमवारी (दि. २७) महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांच्या हस्ते मदतीचे धनादेशांचे वाटप करण्यात आले.

महापौर कार्यालयाजवळील सभागृहात महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी महापौर सहाय्यता निधीची सर्वसाधारण बैठक घेण्यात आली. या वेळी पनवेल महानगरपालिकेच्या महापौर सहाय्यता निधीच्या पटलांवरील विविध विषयांना मंजूरी देऊन, प्रभावती जाधव यांना फॅक्चर ऑफ फ्यमुर शस्त्रक्रियेसाठी दहा हजार रूपये, क्रियांश पाटील यांना शस्त्रक्रियेसाठी पाच हजार रूपये, अनिकेत चव्हाण यांना हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेसाठी १५ हजारांची मदत महापौर सहाय्यता निधीतून आर्थिक मदतीच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले.

या वेळी उपमहापौर सीतताताई पाटील, स्थायी समिती सभापती अॅड. नरेश ठाकूर, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, प्रभाग समिती सभापती प्रमिला पाटील, संजना कदम, नगरसेवक समीर ठाकूर, नगरसेविका सुशीला घरत यांच्यासह महापौर सहाय्यता निधी समितीच्या सर्व सदस्या, उपायुक्त सचिन पवार, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, नगरसचिव तिलकराज खापर्डे तसेच पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २५

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावीत (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती कंपनी आर्टीफिशीयल इंटलिजियन्स क्षेत्रात काम करणारी नाही?**


***अ.*** टाटा एलक्सी  ***आ.*** हॅपीइस्ट माइंड
***इ.*** झेन्सर टेक्नोलॉजीस  ***ई.*** बीएएसएफ इंडिया

**२. लाईफ इन्शुरन्स ऑफ कार्पोरेशन (एलआयसी) चे मुख्यालय या शहरात आहे.**

***अ.*** दिल्ली  ***आ.*** कलकत्ता
***इ.*** मुंबई  ***ई.*** चेन्नई

**३. अदानी उद्योग समूहातील कोणत्या कंपनीची अलीकडे शेअर बाजारात नोंद झाली?**

***अ.*** अदानी इंटरप्रायझेस  ***आ.*** अदानी विल्मर
***इ.*** अदानी ग्रीन एनर्जी  ***ई.*** अदानी पॉवर




**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# सत्तानाट्याचा तिसरा अंक

गेला आठवडाभर सुरू असलेल्या सत्तानाट्याचा तिसरा अंक सोमवारी अखेर कोर्टरूम ड्रामानिशी सुरू झाल्याचे बघायला मिळाले. शिवसेना नेमकी कोणाची हा गहन प्रश्न सध्या महाराष्ट्रातील जनतेच्या समोर उभा ठाकला आहे. या नाटकाचा शेवट न्यायालयात होणार की रस्त्यावरच्या लढाईत हे अजून स्पष्ट झालेले नाही. तथापि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानंतर सत्ताधारी महाविकास आघाडीचा गाशा येत्या काही दिवसांतच गुंडाळला जाईल अशी चिन्हे आहेत.

**खरे तर महाविकास आघाडीचा कारभार आटोपल्यात जमा आहे हे आता साऱ्यांनाच कळून चुकले आहे. फक्त त्यावर सरकारी किंवा न्यायालयीन शिक्कामोर्तब व्हायचे बाकी आहे. शिवसेनेपासून फारकत घेऊन गुवाहाटीत जाऊन बसलेल्या बंडखोर आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांचे सहकारी जंग जंग पछाडत होते. शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी ज्या स्वरुपाची टीकेची चिखलफेक बंडखोर आणि भारतीय जनता पक्षावर केली, त्याने सत्ताधाऱ्यांचे नैराश्यच अधिक ठळक झाले. विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी शिवसेनेच्या १६ बंडखोर आमदारांना अपात्र ठरवण्यासंबंधी कारवाई सुरू केली होती. त्याचेच पहिले पाऊल म्हणून संबंधित बंडखोर आमदारांना नोटिसाही बजावल्या होत्या. परंतु ज्या उपाध्यक्षांवर अविश्वास ठरावाची नोटिस बजावण्यात आली आहे, त्यांनी कोणावरही कारवाई करणे बेकायदेशीर ठरेल असा उलटा दावा बंडखोर आमदारांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात करण्यात आला. उपाध्यक्षांनी बजावलेल्या नोटिशीला सोमवारी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत बंडखोरांनी उत्तर देणे अपेक्षित होते. परंतु त्याआधीच सर्वोच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय पीठाने मनाई आदेश बजावत उपाध्यक्षांसकट सर्व संबंधितांना पाच दिवसांच्या आत प्रतिज्ञापत्र सादर करून सर्व प्रकरणाची सुनावणी १२ जुलैपर्यंत पुढे ढकलली. दरम्यानच्या काळात सरकारवरील अविश्वासदर्शक ठराव अंमलात आणू नये असेही आदेश पारित करावेत अशी विनंती सत्ताधाऱ्यांतर्फे करण्यात आली होती. परंतु तीही फेटाळण्यात आली. सर्वोच्च न्यायालय किंवा कुठलेही न्यायालय विधिमंडळाच्या कामकाजात शक्यतो ढवळाढवळ करत नाही. विधिमंडळाचे अधिकार संवैधानिक असतात, ते अबाधितच रहावेत, हा त्यामागील विचार आहे. त्यानुसारच सर्वोच्च न्यायालय वागले. तथापि, या निर्णयामुळे बंडखोरांना वठणीवर आणण्याचा सत्ताधाऱ्यांचा मार्ग मात्र खुंटला. म्हणूनच न्यायालयीन कामकाज संपल्यावर बंडखोरांचे नेते एकनाथ शिंदे यांनी ट्वीट करून हा वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा विजय आहे अशी प्रतिक्रिया दिली. हे सारे नाट्य घडत असतानाच उरलीसुरली शक्ती एकवटून नावापुरत्या उरलेल्या महाविकास आघाडी सरकारने बंडखोर मंत्र्यांच्या वाट्याला गेलेल्या खात्यांचे उरल्यासुरल्या मंत्र्यांमध्ये फेरवाटप करून टाकले. परंतु अशा कारवायांमुळे आता काहीही फरक पडणार नाही. कारण सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या दिलाशामुळे आमदारकी वाचलेल्या बंडखोरांचे मनोबल चांगलेच उंचावले असणार. दोन तृतियांश बहुमत असल्यामुळे आपला गट हाच मूळ शिवसेना विधिमंडळ पक्ष आहे असा बंडखोरांचा दावा आहे. त्यानुसार आता पुढील पावले टाकली जातील असे दिसते. गेले दोन-तीन दिवस बंडखोरांच्या घरादारांवर हल्ले करण्यापर्यंत शिवसैनिकांची मजल गेली. संजय राऊत यांच्याकडून अभद्र भाषेत या साऱ्या संदर्भात वक्तव्ये केली जात आहेत. ही हुल्लडबाजी आणि प्रवक्त्याच्या अभद्र भाषेमुळेच सत्ता आपल्या हातून लवकर निसटेल याचे भान तरी शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्यांनी ठेवायला हवे होते. तसे घडताना दिसत नाही.**

# देशभरात राबविला जाणार हर घर झंडा उपक्रम




भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या गौरवशाली पर्वानिमित्त १५ ऑगस्ट २०२३पर्यंत आजादी का अमृत महोत्सव या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. याबाबत सविस्तर सूचना केंद्र शासनाने कळविल्या आहेतच. त्यानुसार राज्यात या कालावधीमध्ये भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याबाबत विविध शासन निर्णय/ शासन पत्रांद्वारे यापूर्वीच वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने जनतेच्या मनात भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायमस्वरूपी मनात राहावी व त्याचे संस्मरण व्हावे, या उद्देशाने आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत दि.११ ऑगस्ट २०२२ ते दि. १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये देशभरात हर घर झंडा हा उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना वाचकांसाठी एकत्रितरित्या या लेखाच्या माध्यमातून देण्यात येत आहेत.

१) सर्व शासकीय / निमशासकीय यंत्रणांनी प्रसारमाध्यमातून देशाभिमान व जाणीव-जागृतीची मोहीम प्रभावीपणे राबवावी.२) दि.११ ते दि.१७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत प्रत्येक शासकीय/निमशासकीय व खासगी आस्थापनांवर तसेच प्रत्येक घर व इमारतींवर राष्ट्रध्वज उभारण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करावे. ३) नागरिकांनी राष्ट्रध्वज स्वत: विकत घेऊन उभारण्यासाठी त्यांना प्रेरित करावे. ४) राष्ट्रध्वज उभारणीसाठी जास्तीत जास्त प्रसिद्धी करावी. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करण्यात यावा. ५) केंद्रीय गृह विभाग यांच्या अधिसूचनेन्वये भारतीय ध्वज संहिता २००२ भाग-१ मधील परिच्छेद १.२ मधील राष्ट्रध्वज हे हाताने कातलेल्या किंवा विणलेल्या लोकर/सूत/ सिल्क/खादी कापडापासून बनविलेला असेल, या तरतूदीमध्ये बदल करण्यात आला असून या बदलानुसार राष्ट्रध्वज हे हाताने कातलेल्या आणि हाताने विणलेल्या किंवा मशीनद्वारे तयार केलेल्या सूत /पॉलिस्टर/लोकर/सिल्क/ खादी पासून बनविलेल्या कापडाचे असावेत असा उल्लेख केला आहे. या बदललेल्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेल्या राष्ट्रध्वजाचा वापर या प्रयोजनासाठी करता येईल. ६)संगीतातूनही राष्ट्रध्वजाबाबत वेगवेगळ्या पद्धतीने सादरीकरण करता येईल. ७)हर घर झंडा या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी करावी. ८)या उपक्रमामध्ये राज्य / देशातील / परदेशातील सहभागी होणाऱ्या व्यक्तींची नोंद घ्यावी. ९)राष्ट्रध्वज मुबलक उपलब्ध होण्याबाबत संबंधित यंत्रणांनी खात्री करावी. १०)ऑनलाईन व ऑफलाईन राष्ट्रध्वज विक्री केंद्र राज्याने उपलब्ध करून द्यावे. ११) भारतीय ध्वज संहितेचे पालन व्हावे व जाणते अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अपमान होऊ नये, याची दक्षता घेण्याबाबत नागरिकांमध्ये जाणीव-जागृती करावी.१२)हर घर झंडा या उपक्रमांतर्गत कार्यक्रमाची छायाचित्रे, चित्रफिती, ध्वनीमुद्रण इ. केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावे. १३)नागरिकांमध्ये या उपक्रमाबाबत रुची निर्माण करण्यासाठी वेबसाईट, ई-कॉमर्स तसेच राष्ट्रध्वज भेट देणे अशा माध्यमांचा आधार घेण्यात यावा. १४)स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्रे, स्वस्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्वसामान्य नागरिकांशी निगडीत यंत्रणांचा वापर करुन हा कार्यक्रम यशस्वी करण्यात यावा. याबाबतचा मार्गदर्शक कृती आराखडा पुढील प्रमाणे आहे. (अ) कृती आराखडा:ग्रामपंचायती-सर्व ग्रामपंचायती ग्रामीण प्रसारासाठी महत्त्वपूर्ण माध्यम. संबंधित विभागाच्या स्तरावर आवश्यक असलेल्या ग्रामपंचायतींच्या प्रमुखांबरोबर संपर्क सत्रे / चर्चासत्रे यांचे आयोजन करावे. प्रत्येक गावात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करावी. बचतगटांचा सहभाग स्थानिक शिलाई काम करणाऱ्या गटांद्वारे ध्वजांची शिलाई/ निर्मिती करता येईल. विक्री/ वितरण केंद्र म्हणून ग्रामपंचायत कार्यालयांचा उपयोग करुन घ्यावा. ग्रामपंचायतींद्वारे ध्वजांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करता येईल. ही खरेदी स्थानिक घरांच्या संख्येवर आधारित असावी. सर्व शासकीय इमारती/संस्थांवर ध्वजारोहण करावे. स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे. (आ)कृती आराखडा:आरोग्य केंद्रे, रुग्णालये प्लस आशासेविका या उपक्रमात आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामुदायिक आरोग्य केंद्रे, उपविभागीय रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा महत्त्वपूर्ण सहभाग अपेक्षीत आहे. संदेश वहन साहित्य-प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इत्यादी स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत. प्रसुतिगृहातील सहाय्यक परिचारिकांना तिरंग्याची माहिती असलेल्या पुस्तिका यांचे वाटप करावे. लहान मुलांना रंग देण्यासाठी छापील आकृत्या, छापील कागद उपलब्ध करुन द्यावेत. रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षामध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे,आजादी का अमृत महोत्सव इ. बाबतचे चित्रपट दाखवावेत. (इ)कृती आराखडा: रास्त भाव धान्य दुकाने. रास्त भाव दुकानांनी ध्वज वितरण विक्री केंद्र म्हणून काम पाहावे. या दुकानांमध्ये आणि त्याच्या सभोवताली पूर्व ध्वनीमुद्रित संदेश, राष्ट्रध्वजावरील माहिती माईकवर प्रसारित करावी. (ई)कृती आराखडा:शाळा आणि महाविद्यालये-शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्यामार्फत जाणीव-जागृती करणे.

राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने/शिबिरे/ चर्चासत्र इत्यादिंचे आयोजन करावे.राज्य/जिल्हा/ शाळेचा उल्लेख करुन सोशल मीडियावर फोटो शेअर करावेत. पालकांचा सहभाग-सर्व पालकांना सहभागी होण्यासाठी विशेष दैनंदिन सूचनापत्रे, पत्रके वितरीत करावीत. पालक शिक्षक सभा:हर घर झंडा विषयी माहिती देण्यासाठी पालक शिक्षक सभांचे आयोजन करावे.(उ)कृती आराखडा-पोलीस पोलीस महासंचालकांद्वारे हर घर झंडा या कार्यक्रमाबाबत विशेष बैठकांचे आयोजन करावे. विशेष तिरंगा मानवंदना संचलने आयोजित करावीत. हर घर झंडा या कार्यक्रमाविषयी प्रचार प्रसार व जागरुकतेसाठी प्रचार साहित्य, पत्रिका व इतर साहित्य वितरीत करावे. पोलीस स्टेशन परिसरात फलक, प्रसिध्दीपत्रके व ध्वजारोहण करणे. पोलीस वसाहतींमध्ये राष्ट्रध्वजाची विक्री व वितरण केंद्रे निर्माण करण्याची विशेष मोहीम घ्यावी. सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वसाहतीमध्ये/ घरी ध्वजारोहण करावे. प्रत्येक पोलीस तपासणी नाक्यावर तिरंगा ध्वजाची प्रसिध्दीपत्रके लावावी. (ऊ)कृती आराखडा:परिवहन सुविधा-राज्य परिवहनच्या बसेस हर घर झंडा यांच्या संदेशाने रंगविल्या जाव्यात. तपासणी नाक्यांच्या माध्यमातून हर घर झंडा या कार्यक्रमाचा प्रचार, प्रसार व जागरुकता निर्माण करण्यासाठी माहिती पुस्तिका इ.वितरित करणे. अंतरसंपर्क आणि ध्वनीचित्रमुद्रण प्रणालीद्वारे राज्यांतर्गत प्रवासी बसेसमध्ये सांगितिक जाहिराती, ध्वनीमुद्रित ध्वजगीत वाजविणे, ध्वज संबंधित चित्रफित दाखविणे. (ए)कृती आराखडा: प्रसार माध्यमे संकेतस्थळ, भिंतीचित्रे इ.सर्व सरकारच्या संकेतस्थळांवर अमृत महोत्सव संकेतस्थळ हर घर झेड्यांचा दुवा जोडावा. राज्य आणि जिल्हा स्तरावरील कृती आराखड्याबद्दल प्रसार माध्यमांना विशेष माहिती देणे. या अंतर्गत दररोज विशेष नागरिकांनी उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन या निमित्ताने करण्यात येत आहे.

**-मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**



## बदलते तंत्रज्ञान

### फोन गरम होत असल्यास 'या' सोप्या ट्रिक्स वापरा

आजच्या काळात क्वचितच असा कोणी असेल जो स्मार्टफोन वापरत नाही. आपले बहुतेक काम आपल्या स्मार्टफोनद्वारे केले जाते आणि यामुळेच आपले फोन दाबामुळे गरम होतात किंवा 'हीट-अप' होतात. तुमच्यासोबतही



असे घडत असेल तर घाबरू नका. आज आपण अशाच काही टिप्स आणि युक्त्या जाणून घेणार आहोत, ज्याचे पालन करून तुम्ही तुमचा फोन सहज थंड ठेवू शकता.


फोन सहसा तेव्हाच गरम होता, जेव्हा त्यावर जास्त दबाव असतो. तुमच्या स्मार्टफोनवरील दबाव कमी करण्यासाठी तुमच्या फोनचे ॲप्स व्यवस्थापित करा. तुम्ही वापरत नसलेले ॲप्स बंद करा आणि तुमच्या स्मार्टफोनमध्ये आवश्यक नसलेले ॲप फोनवरून अनइंस्टॉल करा अशा प्रकारे तुम्ही फोन थंड ठेवू शकता.

जेव्हा तुमचा स्मार्टफोन चार्जिंगला असतो तेव्हा त्या काळात फोन न वापरण्याचा प्रयत्न करा. फोन चार्ज होत असताना वापरल्याने स्मार्टफोनच्या प्रोसेसरवर खूप दबाव येतो आणि त्यामुळे फोन गरम होतो. तसेच, नेहमी उच्च-गुणवत्तेचा चार्जर वापरा, तुमच्या स्मार्टफोनसाठी लोकल चार्जर वापरू नका. यामुळे तुमचा खराब होऊ शकतो.

तुमच्या स्मार्टफोनला जास्त गरम होण्यापासून रोखण्यासाठी तुम्हाला तुमच्या स्मार्टफोनची ब्राइटनेस सेटिंग्ज बदलावी लागतील. तुमच्या फोन स्क्रीनची ब्राइटनेस ऑप्टिमाइझ करा. गरज नसेल तेव्हा ब्राइटनेस कमी ठेवा. यामुळे, फोन गरम होणार नाही आणि त्याचवेळी, बॅटरी लवकर कमी होणार नाही. या सोप्या टिप्स आणि युक्त्या फॉलो करून, तुम्ही तुमच्या स्मार्टफोनचे आयुष्य वाढवू शकाल आणि फोनला गरम होण्यापासून रोखू शकाल.

मोबाईल युजर्सची नेहमी एक तक्रार नेहमी असते, ती म्हणजे मोबाईल गरम होतो. अनेकदा चार्जिंगदरम्यान मोबाइल गरम होतो. मोबाईल गरम होण्याची कारणं काय, हे मोबाइल वापरणाऱ्यांना माहिती असणं आवश्यक आहे. कारण अनेकदा मोबाइल गरम होणे धोकादायक ठरण्याची भीती असते. अर्थातच ही भीती खरी ठरुन काही घटनादेखील समोर आल्या आहेत. या मुळे प्रत्येक मोबाइल वापरकर्त्यांने मोबाइल वापरताना बऱ्याच गोष्टींचे ज्ञान घेणे आवश्यक आहे. ही आज एक महत्त्वाची बाब ठरली आहे.

# आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार बाबुराव सडवेलकर



आंतरराष्ट्रीय ख्यातीचे महाराष्ट्रीय चित्रकार बाबुराव नारायण सडवेलकर यांचा जन्म २८ जून १९२८ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण कोल्हापूर येथील राजाराम हायस्कूलमध्ये व महाविद्यालयीन शिक्षण राजाराम कॉलेजमध्ये झाले. शालेय जीवनातच चित्रकार होण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या ठायी निर्माण झाली व या प्रेरणेने त्यांनी त्यांनी ती पूर्ण केली. अनेक आंतरराष्ट्रीय कलाप्रदर्शनांतून व कलामहोत्सवांतून त्यांची चित्रे प्रदर्शित झाली. त्यांच्या कार्याचा घेतलेला हा छोटासा आढावा.

बाबुराव सडवेलकर यांनी 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट', मुंबई येथे उच्च कलाशिक्षणासाठी प्रवेश घेतला. रंग व रेखाकला विषयाची जी. डी. आर्ट ही पदविका त्यांनी संपादन केली. त्यानंतर 'सर जे. जे.स्कूल ऑफ आर्टमध्ये १९५३ ते ७१ या काळात त्यांनी अधिव्याख्याता म्हणून अध्यापन केले. अध्यापन करीत असताना ' फुलब्राइट स्मिथमुंट ' उपकमांतर्गत शिष्यवृत्ती मिळवून ते अमेरिकेला गेले व आधुनिक कलाशिक्षण-पद्धतींचा व तंत्रांचा तेथे त्यांनी अभ्यास केला. तत्पूर्वी अधिव्याख्याता असताना ते बॉंबे ग्रुप ऑफ आर्टिस्टचे सभासद होते. या ग्रुपतर्फे त्यांनी सहा वर्षे प्रदर्शने भरविली. सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या रूपभेद या कला नियतकालिकाचे ते संपादक होते. १९६७ साली महाराष्ट्र राज्याच्या कला संचालनालयाच्या कला संचालकपदी त्यांची नियुक्ती झाली. कला संचालक म्हणूनही त्यांची कारकीर्द भरीव व संस्मरणीय ठरली. १९५५ ते ७४ या काळात त्यांनी स्वत:च्या चित्रांची सहा एकल प्रदर्शने (वन मॅन शो) भरविली. त्याचप्रमाणे अमेरिकेत प्रॉव्हिडन्स, ऱ्होड आयलंड व न्यूयॉर्क येथे त्यांनी स्वत:च्या चित्रांची एकल प्रदर्शने भरविली. अनेक आंतरराष्ट्रीय कलाप्रदर्शनांतून व कलामहोत्सवांतून त्यांची चित्रे प्रदर्शित झाली.

अमेरिकेत १९५० ते ६० या दशकात बहरलेला पाश्चात्त्य अमूर्त चित्रकलेचा नवप्रवाह मुंबईच्या कलाक्षेत्रात रूजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. पॉल क्ले या स्विस आधुनिक चित्रकाराचा त्यांच्यावर प्रभाव जाणवतो. त्यांच्या चित्रांतील प्रतिमा-प्रतिकांतून रूपकात्मक, गूढ, आध्यात्मिक भाव सूचित केले जातात. त्या दृष्टीने चित्रांची शिर्षकेही अन्वर्थक वाटतात. त्यांच्या चित्रांमध्ये साधलेल्या रंग व आकार यांच्या सुसंवादी मेळातून अपूर्व सौंदर्य प्रतीत होते. व्यक्तिचित्रे रंगविण्यातही त्यांनी असामान्य प्राविण्य मिळविले. सुरूवातीच्या काळात त्यांनी विपुल व्यक्तिचित्रे रंगविली. बॉबी, रीटा, दादाजी, गे हेम्स, विजू ही त्यांनी रंगविलेली काही उत्कृष्ट व्यक्तिचित्रे आहेत. चेहऱ्यावरील भावदर्शनातून व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे, ही त्यांच्या व्यक्तिचित्रांमागील प्रेरणा होती. तैलरंगाप्रमाणेच जलरंग माध्यमावरही त्यांचे विलक्षण प्रभुत्त्व होते. मुंबईतील अनेकविध स्थळांची शेकडो चित्रे अपारदर्शक रंगांत रंगवून त्यांनी मुंबईचे आगळेवेगळे रंगमय सचित्र दर्शन घडवले. छटायुक्त कागदाच्या नैसर्गिक छटेचा कौशल्यपूर्ण वापर, रंगांचे द्रुत फटकारे, रंग व छाया-प्रकाशाचे मनोहारी दर्शन इ. वैशिष्ट्यांमुळे ही चित्रे लक्षणीय ठरली आहेत. भित्तिचित्रण व भित्तिलेपचित्रण तंत्रांचाही त्यांचा गाढा, सखोल व्यासंग होता. खडकवासल्याच्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील व एस. के. एफ. फॅक्टरीतील भित्तिचित्रे हे मोठे प्रकल्प त्यांनी सांघिक पद्धतीने पूर्ण केले. मुंबई दूरदर्शनवरून त्यांनी अनेक कलाविषयक कार्यक्रम सादर केले.

**-श्री. दे. इनामदार**




**मुरूड : मुरूड व खारआंबोली परिसरात पावसामुळे शेतकरी सुखावला आहे. या परिसरात शेतीकामांना वेग आला आहे.** (छाया: सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### पावसाळ्यात पिण्याच्या पाण्याची अशी घ्या काळजी!

पाणी हे जीवन आहे. पण हेच पाणी जर का खराब असले तर ते तुमचे आरोग्य खराब करू शकते. सर्वांना पावसाळा ऋतु हवाहवासा वाटतो. बाहेर धो-धो पडणारा पाऊस आणि मस्त वाफाळता चहा, सोबत गरमगरम कांदाभजी हे



सगळे सुख पावसाळ्यात अनुभवायला भेटते. काही जण घरात बसून पावसाळ्याचा आनंद घेतात तर काही जण बाहेर मस्त भटकंती करुन पावसात भिजून आनंद लुटतात. पण पावसाळा आनंदासोबत अनेक आजारही घेऊन येतो, हे विसरता कामा नये.

पावसाळ्यात हवेतून पसरणारे आजार, विषाणूजन्य आणि जीवाणूजन्य संसर्ग, हंगामी ॲलर्जी आणि डासांमुळे होणारे आजार असतात आणि हेच आजार मग पावसाळ्यात लोकांना आपली शिकार बनवतात. त्यामुळे पावसाळ्यात सगळे जण मोठ्या प्रमाणात आजारी पडतात. ऋतू संक्रमणाच्या काळात आपली रोगप्रतिकारक शक्ती उत्तम ठेवणे आणि योग्य आहाराद्वारे ती वाढविणे हाच ऋतू संक्रमणाच्या वेळी होणाऱ्या आजारापासून बचाव करण्याचा एकमेव मार्ग आहे. या पावसाळ्यात तुमच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी तुमच्या आहारात सकस अन्न घटकांचा समावेश करा, कारण तुमच्या पिण्याच्या पाण्याइतकी साधी गोष्टसुध्दा तुम्हाला आजारी पाडू शकते. आपल्या आयुर्वेदात असे सांगितले आहे की, तुम्हाला जर का तुमचे आरोग्य तंदुरुस्त ठेवायचे असले तर नियमितपणे पोटभर पाणी पिणे गरजेचे आहे. तुम्ही कोणते पाणी आणि ते किती पिता हे तुमच्या शरीराच्या कार्यपद्धतीत खूप फरक पाडू शकते.

आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. आशुतोष गौतम यांनी आपल्या लक्षात आणून दिले की, पावसाळ्यात सर्वाधिक आजार हे अशुद्ध पाण्यामुळे होतात. पाणी हे देखील आजार पसरवण्याचे कारण होऊ शकतं. स्वच्छ पाणी तुम्हाला पिण्याचे पाणी स्वच्छ उपलब्ध असले तरीही, तुमच्या पिण्याच्या पाण्यात नियमितपणे जिवन ड्रॉपचे दोन थेंब टाकूनच ते पाणी प्यावे.

तांब्याच्या भांड्यात किंवा चांदीच्या भांड्यात साठवून ठेवलेले पाणी पिणे, हे आरोग्याकरीता उत्तम असते. विशेषतः पावसाळ्यात तरी नियमितपणे तांब्याच्या भांड्यातील पाणी प्यावे. तांबे आणि चांदीचे भांडे तुमच्या पिण्याच्या पाण्यात अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म येतात. लोकांना पावसाळ्यात अपपचनाच्या समस्या वाढतात. या मुळे दिवसभर कोमट पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. तसेच पाणी हे नेहमी जेवणानंतर पाणी प्या असे सांगण्यात येत आहे.

# रायगडातील चार घाट धोकादायक; पावसाळ्यात जीव मुठीत घेऊन प्रवास

**महाड : रामप्रहर वृत्त**

वर्दळीच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले रायगड जिल्ह्यातील कशेडी, ताम्हिणी, वरंध-वाघजाई व आंबेनळी घाट सातत्याने धोकादायक ठरत आहेत. पावसाळ्यात वाहनचालक व प्रवाशांना जीव मुठीत धरून या घाटातून प्रवास करावा लागतो. सतत कोसळणाऱ्या दरडी व भूस्खलनामुळे घाटात वाहतूक ठप्प होण्याचे प्रकारही वारंवार होत आहेत.

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाट, माणगाव-पुणे मार्गावरील ताम्हिणी घाट, महाड-महाबळेश्वर मार्गावरील आंबेनळी घाट आणि महाड-पुणे-पंढरपूर मार्गावरील वरंध-वाघजई घाट वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. या घाटांतून मोठ्या प्रमाणात प्रवासी व मालवाहतूक सुरू असते. परंतु गेल्या काही वर्षांपासून हे घाट धोकादायक बनले आहेत.

कशेडी घाटातून कोकण व गोव्याकडे सतत वाहतूक सुरू असते. गणेशोत्सवात तर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. २००५ मध्ये घाटात दरड कोसळल्याने दहा दिवस वाहतूक ठप्प होती. या घाटातील रस्ता खचत असल्याने महामार्ग विभागाला सतत लक्ष ठेवावे लागते. सध्या महामार्ग रुंदीकरणात घाटाला बोगद्याचा पर्याय निर्माण होत असला तरी यंदाच्या पावसात प्रवाशांना कशेडी घाटातील अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे.

आंबेनळी घाटात प्रत्येक पावसाळ्यात दरड कोसळून वाहतूक ठप्प होते. असाच प्रकार वरंध-वाघजई घाटात घडतो. या ठिकाणीही दरडी कोसळण्याचे प्रमाण अधिक आहे. गतवर्षी महाड व पुणे क्षेत्रात तब्बल २७ ठिकाणी दरडी कोसळल्या होत्या. त्यातच वरंध घाट अरुंद असल्याने दरड कोसळल्यानंतर वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. हा घाट अनेकदा वाहतुकीसाठी बंदही करावा लागतो.

कशेडी घाट वगळता अन्य घाटात तातडीने मदतकार्य पोहचणे अवघड जाते. शिवाय या घाटांना पर्यायी मार्ग नसल्याने अतिदूरच्या मार्गाने वाहने वळवावी लागतात. यामुळे मनस्तापही सहन करावा लागतो.

# म्हसळ्यात भरवस्तीत आले भेकर

## ■ वनविभागाच्या सर्तकतेने जखमी भेकराला मिळाले जीवदान

**म्हसळा : प्रतिनिधी**



(छाया : संजय खांबेटे)

शहरातील भरवस्तीमधील दुकानाच्या बंद शटरला संध्याकाळच्या सुमारास एका भेकराने जोरदार धडक जोरदार धडक दिल्याने ते जखमी झाले. त्याचे वृत्त समजताच म्हसळयाचे वनपाल तत्काळ घटनास्थळी पोहचले त्यांनी पशुधन पर्यवेक्षकांच्या माध्यमातून उपचार करून जखमी भेकराला जिवदान दिले.

म्हसळा तालुक्यात वनविभागाचे क्षेत्र फार मोठे आहे. या क्षेत्रात वन्य श्वापदांचा मुक्त संचार असतो. त्यामध्ये बिबट्यांच्या बरोबरीनेच रानडुक्कर, गवा, भेकर व अन्य प्राणी असतात. गावखेड्यांच्या परिसरांत ही श्वापदे मोठ्या प्रमाणात येतात. असेच एक वाट चुकलेले भेकर सायंकाळी ५.३० ते ६ वाजण्याच्या सुमारास म्हसळा बौद्धवाडी परिसरात आले. तेथील दुकानाच्या बंद शटरला धडक दिल्याने ते जखमी झाले. त्याला पाहण्यासाठी काही वेळातच नागरिकांची प्रचंड गर्दी झाली. भेकर जातीचे श्वापद नागरीवस्तीत आल्याचे कळताच म्हसळ्याचे वनपाल संजय नाईकनवरे तात्काळ घटनास्थळी पोहचले. त्यांनी परिक्षेत्र वनाधिकारी संजय पांढरकामे यांच्या मार्गदर्शनाखाली पशुधन पर्यवेक्षक डॉ. बुलबुले यांच्या माध्यमातून उपचार करून जखमी भेकराला जिवदान दिले. त्यांना वनरक्षक भिमराव सुर्यतळ यांनी मदत केली.

## दरडग्रस्त केवनाळे, तळीये पुनर्वसनासाठी अभ्यास दौरा

**अलिबाग : जिमाका**

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आणि उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलादपूर तालुक्यातील केवनाळे आणि महाड तालुक्यातील तळीये या दरडग्रस्त भागात पुनर्वसनाबाबत अभ्यास दौरा आयोजिण्यात आला होता.

महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसीलदार सुरेश काशिद आणि पोलादपूर तहसीलदार दीप्ती देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग तहसीलदार मीनल दळवी, नायब तहसीलदार अजित टोळकर मंडल अधिकारी, तलाठी व इतर कर्मचाऱ्यांनी पाहणी केली.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे-आदई. ता. पनवेल, जि. रायगड येथील जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे न. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) |
|---|---|---|---|---|
| आदई | सुभाष काथोर शेळके<br>दत्तात्रेय काथोर शेळके | १५ | १/४/ई | ०-४८-२०<br>०-००-२० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, साठेकरार, कुळ, वहिवाट, लिज, इजमेंट, हूकूमनामा, दरखास्त, दावा,वारसाहक्क वगैरे इतर कोणत्याही प्रकारच्या हरकती असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासन २१ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ता. २७/०६/२०२२

पनवेल

सही /-
**ॲड. के. के. गोंधळी**
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स ता. पनवेल, जि. रायगड
मोबाईल : ९७६८३७३२५५



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE –TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No: EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/Tech/Re-Tender-35/2022-23 Dtd.28.06.2022 RFx No.7000023803** | **Sub:-** Invitation of SRM RE-Tender for the dismantling of centralized AC Duct as well as electrical wiring renovation work at 220 kV Mahad SS under EHV (O&M) Dn. Mahad. | **Rs. up to 18,11,705/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs. 5000/- whichever is the highest & tender fee will be the Rs. 500/-plus GST+1% Labour CESS.

**Bid submission is from 28.06.2022 @ 00:00 hrs to 04.07.2022 @ 23:59 Hrs** for above tender

For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer**
**EHV(O&M) DN, MAHAD**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (SECOND CALL)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No: EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/ Tech/Tender-29/ 2022-23 Dtd.04.06.2022 RFx No.7000023461** | **Sub:- Second Call** for SRM E-Tender for weed control along with initial chemical treatment & rodent control treatment 220kV Mahad S/s 220kV Vile Bhagad S/s, 220kV Kandalgaon S/s, 100kV Roha S/s & 100kV Mhasala S/s under EHV (O&M) Division Mahad for the year 2022-23. | **Rs. up to 6,52,241/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs. 5000/- whichever is the highest & tender fee will be the Rs. 500/-plus GST+1% Labour CESS.

**Bid submission is from 28.06.2022 @ 00:00 hrs to 04.07.2022 @23:59 Hrs** for above tender

For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer**
**EHV(O&M) DN, MAHAD**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE (Extension)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No: EE/EHV (O&M) / DIVN/MHD/Tech/Tender-31/ 2022-23 Dtd.17.06.2022 RFx No.7000023630** | **Sub:-** Extension for SRM E-Tender for providing and fixing of LED fixtures at various substation under EHV(O&M)Dn. Mahad. | **Rs. up to 11,89,112/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs. 5000/- whichever is the highest & tender fee will be the Rs. 500/-plus GST+1% Labour CESS.

**Bid submission is from 28.06.2022 @ 00:00 hrs to 04.07.2022 @ 23:59 Hrs** for above tender

For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer**
**EHV(O&M) DN, MAHAD**



राव साहेब
अर्जदारांचे वकील ॲड. नित्यानंद राम ठाकूर
मु. कोपर, पो. गव्हाण, ता. पनवेल जि. रायगड.

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर यांचे कोर्टात**

चौकशी अर्ज नं. ६३१/२०२२
नि. ८ ड
ने.ता. २७/०७/२०२२

१. कुमार संगभुषण शरद जाधव
वय : १५ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
२. कुमारी सृष्टी शरद जाधव
वयः १३ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
तर्फे अज्ञान पालकर्ती आई सरला शरद जाधव
वय : ३८ वर्षे, व्यवसाय गृहीणी
रा. प्लॉट नं. ४१, सेक्टर ०७, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल, ता. पनवेल जि. रायगड.
नवी मुंबई. पिन नं. ४१०२०६. } **अर्जदार**

**विरूध्द**

उषा शरद जाधव
वय : ५८ वर्षे, व्यवसाय : गृहीणी
पत्ता : शरद महारू जाधव
रूम नं. २०३ त्यागराज हौ. सो.
लोक पुरम, ठाणे (पु.) पिन नं.४००६१६ } **सामनेवाले**

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की सदरहु अर्जदार वारस सर्टीफीकेट मिळण्यासाठी मे. कोर्टात अर्ज दाखल करत आहेत. अर्जदार नं. १ व २ चे वडील व सामनेवाले यांचे पती **कै. शरद महारू जाधव** हे ०४/०८/२०२० रोजी अपोलो हॉस्पीटल इंटरप्राइझेस लिमीटेड, प्लॉट नं.१३, से. २३, सि.बी.डी., बेलापुर, नवी मुंबई येथे मरण पावले. अर्जदार हे मयत कै. शरद महारू जाधव यांचे वारस आहेत. **कै. शरद महारू जाधव** यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| नं. | मिळकत | पत्ता | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १ | जुचंद्र वसई | रुम नं.५४, ५वा माळा, मित्तल इनक्लेव, बि.नं.८, अे-विंग, नालंदा उद्यान, परेला नगर, जुचंद्र, वसई (ई) जि. पालघर | ६५.९६ चौ.मी.<br>९.६६ चौ.मी. |
| २ | पनवेल | प्लॉट क्र.बी-४१, से.७ सृष्टी रो-हाऊस, खांदा कॉलनी, नवीन पनवेल | ६० चौ.मी. |
| ३ | दिंडोशी | गिरीशिखर, बिल्डींग नं.६, रु. नं.६०१, ६वा माळा, म्हाडा कॉलनी, न्यू दिंडोशी, मुंबई | ८६० चौ.मी. |
| ४ | जमीन - सर्व्हे नं. ३७/२ | मु. चिंच गव्हाण, ता. चाळीसगाव, जि. जळगाव (महाराष्ट्र) | हे. आर. १.०८.०० |

सबब रक्कमेबाबत **कै. शरद महारू जाधव** यांचे कायदेशिर वारस असल्याचा वारस सर्टीफीकेट मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस सर्टीफीकेटच्या कामी कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे. कोर्टात दाखल कराव्यात मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस सर्टीफीकेट दिला जाईल यांची नोंद घ्यावी.

आज ता.१९/०५/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिला.

**सही/-**
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
कनिष्ठ स्तर, पनवेल

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय
कनिष्ठ स्तर, पनवेल



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (SECOND CALL)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No: EE/EHV (O&M) / DIVN/MHD/Tech/Tender-28/ 2022-23 Dtd. 07.06.2022 RFx No.7000023474** | **Sub:-** Second Call for SRM E-tender for providing various consumables items for pre monsoon maintenance at various locations under Mahad Dn.for the year 2022-23. | **Rs. up to 485325/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs. 5000/- whichever is the highest & tender fee will be the Rs. 500/-plus GST+1% Labour CESS.

**Bid submission is from 28.06.2022 @ 00:00 hrs to 04.07.2022 @23:59 Hrs** for above tender

For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer**
**EHV(O&M) DN, MAHAD**



## डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

दापोली ४१५ ७१२, जिल्हा – रत्नागिरी (महाराष्ट्र)
निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग

**कृषि तंत्र पदविका, मत्स्य अभियांत्रिकी पदविका व**
**बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२२-२३**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरिता कृषि तंत्र पदविका, मत्स्य अभियांत्रिकी पदविका व बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठ स्तरावर 'ऑफलाईन पध्दतीने' राबविण्यात येत आहे. विद्यालये, प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज विद्यापीठ संकेतस्थळ www.dbskkv.org वर दिनांक **२९/०६/२०२२** पासून व बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम दिनांक **२९/०६/२०२२** पासून उपलब्ध करुन देण्यात येईल.

**अभ्यासक्रम, प्रवेश पात्रता व शुल्क :**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | प्रवेश अर्ज शुल्क (रुपये) | पात्रता | प्रवेश अर्ज सादर करावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि तंत्र पदविका (मराठी माध्यम) | २ वर्षे | खुला प्रवर्ग: ४००/-<br>आरक्षित प्रवर्ग: २००/- | उमेदवार महाराष्ट्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालान्त परीक्षा (इ. १० वी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण | दिनांक – २९/०६/२०२२ ते २०/०७/२०२२ |
| २ | मत्स्य अभियांत्रिकी पदविका (Fisheries Engineering) (इंग्रजी माध्यम) | ३ वर्षे | | | |
| ३ | बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र | १ वर्षे | खुला प्रवर्ग: ५०/-<br>आरक्षित प्रवर्ग: २५/- | इयत्ता ९ वी उत्तीर्ण | दिनांक – २९/०६/२०२२ ते २०/०७/२०२२ |
| आरक्षित प्रवर्ग – अ.जा.,अ.ज., वि.जा.*, भ.ज.*, इ.मा.व.*, वि.मा.प्र.*, एस.ई.बी.सी.*, इ.डब्ल्यू.एस.*, (* उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य ) | | | | | |

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवायची कार्यपध्दती.**

- उमेदवाराने www.dbskkv.org या संकेतस्थळावरील Admission या टॅबवर क्लिक करुन कृषि पदविका व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठीचा प्रवेश अर्ज दिनांक २९/०६/२०२२ पासून व बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज दिनांक २९/०६/२०२२ पासून डाउनलोड करुन, A4 पेपरवर प्रिंट काढून माहिती पुस्तिकेतील सूचनांचे पालन करुन स्वहस्ताक्षराने पूर्ण भरुन प्रवेश घ्यावयाच्या विद्यालय/केंद्रामध्येच विहित मुदतीत सादर करावा. यानंतर प्रवेश अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही.
- प्रवेश अर्ज भरताना उमेदवाराने पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी व आवश्यक ती संबंधित मूळ कागदपत्रे साक्षांकीत/स्वसाक्षांकीत करुन, प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या कृषि तंत्र विद्यालय/मत्स्य अभियांत्रिकी पदविका विद्यालय/बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम केंद्रात प्रवेश अर्जासह विहित शुल्क भरुन सादर करावे.
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क रोखीने/डीडीने संबंधित विद्यालय/केंद्रात भरावे व पावती घ्यावी.
  अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात न घेता रद्दबातल ठरविण्यात येतील याची नोंद घ्यावी.
- अधिक तपशीलासाठी निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली, या कार्यालयाशी संपर्क साधावा दूरध्वनी क्र. ०२३५८-२८२४११, २८२४१२ विस्तार १२२/१२१
- **माहिती पुस्तिका विद्यापीठ संकेतस्थळ www.dbskkv.org दिनांक २९/०६/२०२२ तसेच बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठीची माहितीपुस्तिका दिनांक २९/०६/२०२२ पासून उपलब्ध आहे**

ठिकाण : दापोली.
दिनांक : २४/०६/२०२२
क्रमांक : आरओसी-२०२२-२३/क्र.-५/सी१४९४

**सही/-**
**कुलसचिव,**
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जिल्हा – रत्नागिरी.



**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **हक्कसोडपत्राची जाहीर सूचना**

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजुर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| १ | तळोजा १०१७ | तळोजा/ पाचनंद ७८ अ | ३६/२ | ०-६५-५ पैकी ०-४०-५ | ३५० चौ.मी. | – | १) श्रीमती ताईबाई गजानन उलवेकर,<br>२) श्रीमती नागुबाई सुदाम गोरपेकर<br>३) श्रीमती सुमन ज्ञानेश्वर म्हात्रे<br>**हे असून दुसरेपक्षीय हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.** | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-१, दस्त क्र. ५१९९/२००९, दि. ३०.१०.२००९ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>**१) श्री. भरत काळुराम म्हात्रे**<br>**२) श्री. सुरेश काळु म्हात्रे**<br>**३) श्री. वामन काळु म्हात्रे**<br>यांना हक्क व हितसंबंध प्रदान केलेले आहेत. |
| | | | | | | | १) उंदीर उर्फ नाना हिरु उर्फ हिरा म्हात्रे<br>२) श्रीमती बेमटुबाई उर्फ बेबीबाई बामा म्हात्रे<br>३) श्रीमती काळुबाई गोपीनाथ मोर्बेकर<br>४) श्रीमती कुसुम अनंता म्हात्रे<br>५) श्रीमती भिमाबाई नारायण पाटील<br>६) श्रीमती बारकुबाई तुळशीराम ठाकुर<br>७) श्रीमती द्रोपदीबाई अभिमन्यु पाटील<br>८) श्री. नारायण पांडुरंग म्हात्रे<br>९) श्री. हरीदास पांडुरंग म्हात्रे<br>१०) श्री. रतन पांडुरंग म्हात्रे<br>११) अभिमन्यु पांडुरंग म्हात्रे<br>१२) श्रीमती मंजुळाबाई उर्फ कुसुम बेंदर पाटील<br>१३) श्रीमती फसुबाई मारुती पाटील<br>१४) श्रीमती चैतुबाई पांडुरंग म्हात्रे<br>**हे द्वितीय पक्षीय हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.** | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-१, दस्त क्र. ७२००/२००९, दि. ३०.१०.२००९ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>**१) श्री. मदन बामा म्हात्रे**<br>**२) श्री. भरत काळुराम म्हात्रे**<br>**३) श्री. सुरेश काळु म्हात्रे**<br>**४) श्री. वामन काळु म्हात्रे**<br>**५) श्रीमती ताईबाई गजानन उलवेकर**<br>**६) श्रीमती नागुबाई सुदाम गोरपेकर**<br>**७) श्रीमती सुमन ज्ञानेश्वर म्हात्रे**<br>यांना हक्क व हितसंबंध प्रदान केलेले आहेत. |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/१२९/२०२२-२३

## नवी मुंबईत धोकादायक कॉलनीवर कारवाई

# इन्कम टॅक्सची इमारत जमीनदोस्त

### रहिवाशांना दिलासा



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

खंडाररूपी धोकादायक आणि जीर्ण झालेल्या बेलापूर येथील इन्कम टॅक्स इमारतीत बेकायदा अनैतिक धंदे, गर्दुल्ले, चोर यांच्या वावरामुळे आयकर कॉलनीतील नागरिक त्रस्त होते. येथील वसाहतींचे पुनर्निर्माण होणार असून आता त्या जमीनदोस्त करण्यात आल्याने मागील १० वर्षांपासून राहत असलेल्या आयकर कॉलनीतील रहिवाशांना दिलासा मिळाला आहे.

पारसिक हिल डोंगररांगाच्या कुशीत वसलेल्या बेलापूर सेक्टर २१ आणि २२ मध्ये सिडकोने १९९६ साली इन्कम टॅक्स या केंद्रीय शासन आस्थापनाला ए टाईप आणि सी टाईप इमारती विक्रीने दिल्या. सुरुवातीला येथे इन्कम टॅक्स कर्मचारी निवास करत होते, मात्र येथील इमारतीच्या बांधकामाच्या तक्रारी वाढू लागल्याने १० वर्षांपूर्वी येथील कर्मचारी राहते घर सोडून इतरत्र गेले. मुळातच हा परिसर गर्द हिरवाईने नटलेला आहे. सर्व इमारती निर्मनुष्य झाल्याने झाडे-झुडपे मोठ्या प्रमाणात वाढली, घरांचे रूपांतर खंडारात झाल्याने काही घरांचा ताबा अनैतिक घटकांनी घेतला. या घरात भिकारी, गर्दुल्यांचा वावर वाढला. भंगार चोर दिवसाढवळ्या इमारतीत शिरकाव करून लाकडी दरवाजे, खिडक्या, लोखंड, नळ आदी वस्तू घेऊन पसार होत होते.

या घटकांचा त्रास आयकर कॉलनीतील बी टाईप, डी टाईप आणि एफ टाईपमधील नागरिकांना होत होता. रात्रीच्या वेळी चोरी होण्याचे प्रकारही वारंवार घडत होते. हा परिसर गर्द झाडीने वेढलेला असल्याने साप, विंचू अजगर आदिंची भीती स्थानिक नागरिकांना होती. येथील इन्कम टॅक्स वसाहत संबंधित प्रशासनाने आता पुर्णतः जमीनदोस्त केल्याने आयकर कॉलनीतील नागरिकांची आता असामाजिक घटकापासून सुटका झाली आहे.

**इन्कम टॅक्सच्या धोकादायक आणि जीर्ण झालेल्या इमारतीत वर्षानुवर्षे असामाजिक घटकांचा मुक्त वावर मोठ्या प्रमाणात होता. याचा त्रास आयकर कॉलनीतील नागरिकांना होता. येथे एमईएस विद्या मंदिर हायस्कूल आहे. येथील शालेय मुलींनाही असुरक्षित वाटत होते. ही इमारती जमीनदोस्त झाल्याने नागरिकांत समाधान आहे.**
**-सुभाष गायकवाड, स्थानिक भाजप युवा नेते**

## शिवसेनेत उभी फूट

### वाशीतील निषेध आंदोलनामध्ये बडे नेते गैरहजर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह बंडखोर आमदारांविरोधात शिवसेनेतर्फे शनिवारी (दि. २५) वाशी येथे केलेल्या निषेध आंदोलनात शिवसेनेचे बडे नेते गैरहजर होते. बेलापूर विधानसभा मतदार संघातील काही माजी नगरसेवक आणि ऐरोली विधानसभा मतदार संघातील बड्या नेत्यांनी या आंदोलनाकडे पाठ फिरवली. त्यामुळे एकनाथ शिंदेंवरून नवी मुंबईच्या शिवसेनेतही फूट पडल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

नवी मुंबई महापालिकेची निवडणूक २०२० मध्ये कोविडमुळे पुढे ढकलण्यात आली. यादरम्यान महापालिकेवर प्रशासकांची नेमणूक करण्यात आली. आता एकनाथ शिंदेंनी वेगळा मार्ग शोधल्यामुळे आता या शिंदे समर्थक नगरसेवकांची कोंडी झाली आहे. याचे प्रतिबिंब शनिवारी झालेल्या शिवसेनेच्या आंदोलनात स्पष्ट दिसून आले. बेलापूरचे आंदोलन आहे असे दाखवून ऐरोलीतील सर्व बडे नेते गैरहजर होते. उपजिल्हाप्रमुख किशोर पाटकर हेसुद्धा या आंदोलनात दिसले नाहीत. काही नेत्यांनी प्रकृतीचे कारण आणि गावाकडे मयत झाल्याची कारणे देऊन आंदोलनात जाणे टाळले.

नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या समर्थक आमदारांसोबत बंड पुकारल्यानंतर ऐरोली, दिघा आणि तुर्भे येथील काही माजी नगरसेवक शिंदे यांच्या पाठीशी असल्याची चर्चा शिवसेनेच्या गोटात रंगली आहे. हे सर्व नगरसेवक शिंदेंच्या भरवशावर शिवसेनेत आल्यामुळे आता तेसुद्धा शिंदेंसोबत जाणार असल्याचे बोलले जात आहे.

शिंदेंच्या बंडानंतर या नगरसेवकांकडून त्यांच्याविरोधात अथवा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या समर्थनात बॅनरबाजी किंवा वक्तव्य केले नाही.

## नवी मुंबई पालिकेकडून निराधारांना अर्थसहाय्य

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेने कोरोना काळात निराधार महिलांना आधार देण्यासाठी समाज विकास विभागाकडून राबविण्यात आलेल्या विविध योजनांतून पालिका क्षेत्रातील २६२ महिलांना प्रत्येकी दीड लाख रुपयांप्रमाणे जवळपास साडेचार कोटी रुपयांचे आर्थिक साह्य केले आहे; तर उद्योग-व्यवसायासाठी पहिल्या टप्प्यात नऊ लाख रुपये आर्थिक मदत व १६८ अनाथ झालेल्या मुलांच्या संगोपनासाठी अर्थसाह्य केले आहे.

कोरोनामुळे अनेक कुटुंबांमध्ये आई व वडील असे दोन्ही पालक अथवा त्यापैकी एका पालकाचा मृत्यू होऊन मुले अनाथ झाली आहेत. पतीच्या मृत्यूने अनेक कुटुंबांत पत्नीला कौटुंबिक व आर्थिक हानीला आकस्मिकरीत्या सामोरे जावे लागले. अशा महिलांना रोजगार, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी; तर मुलांना शिक्षणासाठी महापालिकेने अर्थसाह्य देण्यासाठी विविध योजनांही सुरू केल्या आहेत.

दोन वर्षांत महापालिकेने २६२ निराधार महिलांना प्रत्येकी दीड लाख रुपयेप्रमाणे तीन कोटी ९९ लाख रुपयांची मदत केली आहे. याशिवाय साहित्य संच घेऊन उद्योग व्यवसाय करणाऱ्या २१ महिलांना पहिल्या टप्प्यात जवळपास नऊ लाखांचे अर्थसाह्य दिले आहे; तर १६८ मुलांना संगोपनासाठी ४० लाखांचे वितरण केले आहे.

समाज विकास विभागाचे उपायुक्त दादासाहेब चाबुकस्वार यांनी विभागनिहाय काम करणाऱ्या समूहसंघटकांना निराधार महिला आणि मुलांची माहिती प्राप्त झाल्यास तत्काळ कुटुंबाचा शोध घेऊन मार्गदर्शन करावे, अशा सूचना केल्या आहेत. या लाभार्थींची माहिती प्राप्त होताच विविध योजनांचे मार्गदर्शन करून अर्ज भरून घेतले जात आहेत.

**कोरोनामुळे पतीचे निधन झाल्यामुळे घरसंसार कसे चालवावेत तसेच दोन्ही मुलांचे शिक्षण कसे पूर्ण करावे, असा प्रश्न निर्माण झाला होता. नवी मुंबई महापालिकेने राबवलेल्या विविध योजनांची माहिती परिसरातील समूह संघटकांकडून मिळाली. आर्थिक मदत, मुलांचे संगोपन आणि व्यवसाय असे तीनही योजनांचे अर्ज भरून घेतल्यामुळे तीनही योजनांचा लाभ मिळाला तसेच व्यवसायासाठी अर्थसाह्य केल्यामुळे कुटुंबाला मोलाची मदत झाली.**
**-नंदा गोपीनाथ मालुसरे, लाभार्थी**

## एपीएमसीतील व्यावसायिकाला तब्बल १७ लाखांचा गंडा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एपीएमसीतील एका व्यावसायिकाच्या बँक खात्याला लिंक असलेला मोबाइल फोन बंद करून त्यांच्या खात्यातील तब्बल १७ लाख ३७ हजार रुपये परस्पर दुसऱ्या बँक खात्यात वळते केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. एपीएमसी पोलिसांनी या प्रकरणातील गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार व्यावसायिकाचे नाव सतीशचंद्र मिश्रा (वय ५२) असून ते घणसोलीत राहतात. मिश्रा यांचा कस्टम क्लीयरन्सचा व्यवसाय असून आहे. १५ जून रोजी दुपारी मिश्रा यांच्या मोबाइलचे सिमकार्ड त्यांच्या विनंतीनुसार बंद करण्यात आल्याचा मेसेज त्यांच्या मोबाइलवर आला. त्यांनी वाशीतील सर्विस सेंटरमध्ये माहिती घेतली असता, सिम चोरी झाल्याने हा नंबर बंद करण्याची विनंती करण्यात आल्याने कार्ड बंद करण्यात आल्याचे त्यांना सांगण्यात आले. मिश्रा यांचा फोन बंद असल्याने सायबर चोरट्याने त्यांच्या दोन्ही बँक खात्यांतील तब्बल १७ लाख ३७ हजार रुपये वळते करून घेतले.

मिश्रा यांनी सिमकार्ड सुरू केले व बँक खाते तपासले तेव्हा पैसे काढण्यात आल्याचे समजले. त्यांनी बँकेत चौकशी केली तेव्हा दोन्ही खात्यांतून १७ लाख ३७ हजार रुपये दुसरीकडे वळते झाल्याचे समजले. यानंतर मिश्रा यांनी एपीएमसी पोलीस ठाण्यात धाव घेतली.





**पनवेल : भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे दैवत लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनी आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील सभागृहात वारकरी संप्रदायातील मान्यवरांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते ज्येष्ठ सनदी लेखापाल व कीर्तनकार ह. भ. प. एकनाथ आत्माराम पाटील, कीर्तनकार ह. भ. प. विनायक महाराज कांबेकर, शिल्पकार व गायक ह. भ. प. अरुणबुवा कारेकर आणि भजनी कलावंत संगीत विषारद ह. भ. प. निवृत्तीबुवा चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी कामगार नेते महेंद्र घरत, १९८४च्या आंदोलनातील रणरागिणी भारतीताई पवार, 'दिबां'चे सुपुत्र अतुल पाटील, नगरसेविका दर्शना भोईर, मंडळाचे उपाध्यक्ष जे. डी. तांडेल, सचिव बी. पी. म्हात्रे, सहसचिव विजय गायकर आदी उपस्थित होते.**

## बॅटरीवरील गाड्यांच्या वाहनचालकांवर कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने बॅटरीवर चालणाऱ्या गाड्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. जवळपास अशा २५ किमीपेक्षा जादा वेगमर्यादा असणाऱ्या वाहनांची नोंदणी न केलेल्या १६ वाहनांवर आरटीओकडून कारवाई करण्यात आली असून दोन लाख ९९ हजार ५०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

२५० वॅटपेक्षा कमी क्षमता आणि कमाल ताशी २५ किमी वेगमर्यादा असणाऱ्या वाहनांना नोंदणीची गरज नसली तरी ते चालवणाऱ्यांकडे लायसन्स असणे अनिवार्य आहे. जर अल्पवयीन मुलांने वाहन चालवल्यास त्याच्या पालकांना तीन महिने तुरुंगवास व २५ हजार रुपये दंड अशी तरतूद असल्याची माहिती आरटीओच्या अधिकाऱ्याने दिली.

दुचाकीची नोंदणीच नसल्याने अशा दुचाकी चालवण्यासाठी अनुज्ञप्तीची (लायसन्स) देखील आवश्यकता नाही, असे सांगितले जाते, पण प्रत्यक्षात मात्र नियमानुसार बॅटरीवर चालणाऱ्या वाहनचालकाकडे त्यासंबंधी लायसन्स असणे अनिवार्य आहे.

## खरेदीसाठी कापडी पिशव्यांकडे कल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**


बाजार म्हटला की, खरेदीसाठी हातात पिशवी हवीच. आता पिशवीशिवाय शॉपिंग अधुरीच असल्याचा अनुभव अनेकांना आहे. राज्यात प्लास्टिक पिशव्यांच्या वापराला बंदी आल्यापासून खरेदीसाठी जाणाऱ्यांचा कापडी पिशव्यांकडे कल वाढत आहे. या पिशव्यांमध्ये अनेक प्रकारच्या डिझाईन्स उपलब्ध होत असल्याने रंगीबेरंगी पिशव्या घेऊन बाजारात खरेदीसाठी जाणे हल्ली फॅशन होऊ लागली आहे.

खरेदीसाठी बाहेर जायचे म्हटले की, हातात एक पिशवी असतेच. विशेषतः पूर्वी खरेदीसाठी प्लास्टिक पिशवीचे महत्त्व अधिक होते, परंतु सरकारने एकल वापर होणाऱ्या प्लास्टिकवर बंदी आणल्याने दिवसेंदिवस प्लास्टिकच्या पिशव्या बाजारातून कमी होऊ लागल्या आहेत. जुन्या काळात कापडी बॅग्ज हाच पर्याय होता; पण प्लास्टिक आल्यामुळे कापडी पिशव्या नामशेष होऊ लागल्या आणि लोकांना अनफॅशनेबल वाटू लागल्या. पण गेल्या काही काळापासून कापडी पिशव्या वापरण्यास सुरुवात झाली आहे. प्लास्टिकच्या पिशव्यांची जागा आता कापडी पिशव्यांनी घेतली आहे. डिझाईन्स नसलेल्या कापडी पिशव्या हल्ली नवे रूप घेऊ लागल्या आहेत. रंगीबेरंगी, नवनवे प्रकार तयार होऊ लागल्याने हल्ली कापडी पिशवी वापरणेदेखील फॅशन होऊ लागले आहे.

साड्या, ताग, डिझायनर कपडे, जीन्सपासून बनवलेल्या कापडी पिशव्यांना जास्त पसंती मिळू लागली आहे. मग भाजी खरेदी करायची असो, टिफिन बॉक्स किंवा मग शॉपिंग कापडी पिशव्या उत्तम पर्याय आहे, असे नागरिक मानतात.

### घरीच पिशव्या बनवण्यास प्राधान्य

**कापडी पिशव्यांचे अनेक कारखाने आहेत; पण काही महिला या घरीच स्वतःच्या हाताने तयार केलेल्या पिशव्या वापरण्यासाठी प्राधान्य देतात. कापडी पिशव्या वापरणे हा फक्त पर्याय राहिलेला नसून त्याचे स्वरूप बदलू लागले आहे. त्यामुळे त्याच्याकडे बघण्यात येणारा कंटाळवाणा दृष्टिकोन आता फॅशन होऊ लागला आहे.**



## चिरनेर येथे अजगराला जीवदान



**उरण : वार्ताहर, बातमीदार, प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील गजानन केणी यांच्या शेतावर कोंबड्याच्या शोधात ८.५ फुटी लांबीचा अजगर आला असल्याचे मुलगा निलेश केणी यास समजले. त्याने तातडीने वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्था चिरनेरचे सर्पमित्र काशिनाथ खारपाटील यांना कळविले. सहकारी सर्पमित्र मनोहर फुंडेकर व सहकारी घटनास्थळी पोहचून त्या अजगरला आपल्या कौशल्याने पकडून चिरनेर येथील रानसई परिसरातील बेलडोंगरी या भागात सोडून दिले.

या वेळी उरणचे वनरक्षक इंगोले, पवार, पनवेल विभागातील भाऊ, सी. डी. पाटील, सय्यद, वन्य जीव निसर्ग संरक्षण संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी, सदस्य काशिनाथ खारपाटील आदी उपस्थित होते.

## पाले येथे श्रीया फाउंडेशनतर्फे वृक्षारोपण

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या आवाहनानुसार व मार्गदर्शनानुसार उरण तालुक्यातील पाले गावातील श्रीया फाउंडेशन या सामाजिक संस्थेतर्फे वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला.

आजादी से अंत्योदय तक या रायगड जिल्हा परिषदेच्या विशेष कार्यक्रमांतर्गत या वर्षी प्रथमच विविध प्रकारची १०० झाडे लावण्याचा व जोपासण्याचा संकल्प श्रीया फाउंडेशन या सामाजिक संस्थेने केलेला आहे. पाले येथे रविवारी (दि. २६) हनुमान मंदिर परिसर व पाले डोंगरात झाडे लावा झाडे जगवा असा संदेश देत वृक्षारोपण करण्यात आले.

या वेळी श्रीया फाउंडेशन पालेच्या अध्यक्ष स्मिता म्हात्रे, महाराष्ट्र कॉमन सर्विस सेंटरचे सिनियर मॅनेजर समीर पाटील, रायगड जिल्हा मॅनेजर राजेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, जितेंद्र थळे, अमरदिप घरत, निवृत्त पोलीस निरीक्षक चंद्रकांत म्हात्रे, निवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक पोसुराम म्हात्रे, श्रीकांत म्हात्रे, जेएनपीटी सुप्रिटेंड ऋषिकेश म्हात्रे, पाले गाव अध्यक्ष अमित म्हात्रे, प्रसिद्ध निवेदक सुनील वर्तक, पाले गावातील ग्रामस्थ संदीप म्हात्रे, विनोद म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, प्रितम म्हात्रे, अनिल म्हात्रे, सदाशिव म्हात्रे, मेनन म्हात्रे, राजेश म्हात्रे, हनुमान म्हात्रे, चंद्रकांत म्हात्रे, सुरेंद्र म्हात्रे, धर्मा म्हात्रे, मच्छिंद्र म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, रुपाली म्हात्रे, दर्शना म्हात्रे, रविना म्हात्रे, विजया म्हात्रे, तृप्ती म्हात्रे, श्रीया म्हात्रे, रुचिता म्हात्रे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार मिलिंद म्हात्रे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र थळे यांनी १०० झाडे भेट दिली.



# वाकण-खोपोली मार्गावरील पुलांचे काम अपुर्णावस्थेत

**पाली : प्रतिनिधी**

वाकण-पाली-खोपोली राज्यमहामार्गावर जांभूळपाडा, भालगूल व पाली येथील नदीवरील पुलांची कामे सुरू आहेत. मात्र ही कामे अजूनही अपूर्ण आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पालीतील अंबा नदी पुलावरून पाणी जाऊन वाहतूक खोळंबणार आहे.

पावसाळ्यापूर्वी येथील पाली अंबा नदीवरील पुलाच्या एका मार्गिकेचे कामे पूर्ण करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन होते. मात्र हे काम अजूनही पूर्ण झालेले नाही. त्यामुळे अजूनही येथील जुन्या, अरुंद व कमी उंचीच्या पुलावरून वाहतूक सुरू आहे. मुसळधार पाऊस आल्यास या पुलावरून पाणी जाते व दोन्ही बाजूंची वाहतूक खोळंबते.

जांभुळपाडा येथील अंबा नदीवरील पुलांच्या एका मार्गिकेचे काम पूर्ण झाले आहे. सध्या या नवीन पुलावरून वाहतूक सुरू आहे. मात्र येथील जुना पूल पाडून त्या जागी नवा पुल उभारण्याचे काम संथ गतीने सुरू आहे. भालगूल येथील पुलाचे काम पूर्ण झाले आहे. मात्र नवीन पुलाला लागून असलेली जागा शेतकऱ्यांकडून देण्यात आलेली नाही. या जागेसंदर्भात वाद सुरु आहे. परिणामी नवीन पूल बांधूनही तेथून वाहतूक सुरू करण्यात आलेली नाही.

**वाकण-पाली-खोपोली या राज्यमहामार्गाच्या रुंदीकरणाचे काम या महिन्या अखेरपर्यंत १०० टक्के पूर्ण होईल. फक्त पाली पुलाचे काम नोव्हेंबरमध्ये पूर्ण होईल. जांभूळपाडा पुलाची एक बाजू चालू करण्यात आली आहे. या राज्यमहामार्गावरील जुन्या पुलांचे स्ट्रॅक्टचरल ऑडिट करण्यात आले आहे. हे जुने पूल धोकादायक स्थितीत नसून प्रवासाकरिता योग्य आहेत.**
**-सचिन निफाडे, उपअभियंता, एमएसआरडीसी**

पावसाळ्यात यंदाही वाहणार पाली पुलावरून पाणी



(छाया : धम्मशील सावंत)

### महत्वाचा मार्ग

वाकण-पाली-खोपोली राज्यमहामार्ग पुणे, मुंबई येथून खोपोलीमार्गे कोकणाकडे जाण्यासाठी वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. हा मार्ग मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय मानला जातो. तसेच मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-बेंगलोर व मुंबई-गोवा महामार्गाला जोडतो. त्याच बरोबर येथून विळेमार्गे पुणे आणि माणगावलाही जाता येते. त्यामुळे मुंबई, पुणे तसेच कोकणासाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे. वाकण-पाली-खोपोली राज्यमहामार्गावरील जांभूळपाडा, भालगूल व पाली येथील पूल पूर्ण झाल्यास येथील वाहतूक सुरळीत होईल.

***असे आहेत नवीन पूल*** *-पाली, जांभूळपाडा व भालगुल या ठिकाणी तब्बल २५ कोटींच्या निधीतून अधिक क्षमता, रुंदी आणि उंचीचे पूल तयार होत आहेत. पाली येथील नवीन पुलांची रुंदी १६ मीटर आहे. तर लांबी ११० मीटर तसेच जांभूळपाडा पूलांची रुंदी १६ मीटर, लांबी ७० मीटर इतकी आहे. भालगूल पूलांची रुंदी १६ मीटर तर लांबी ५५ मीटर आहे. हे तिन्ही पूल चार लेनचे होणार आहेत. त्यांची भार पेलण्याची क्षमता ७५ टन आहे.*

# जीवनविद्या मिशनच्या माध्यमातून १० गावांचा कायापालट करणार -आनंद राणे



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

जीवनविद्या मिशनच्या माध्यमातून आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने येत्या तीन वर्षात राज्यातील दहा गावांचा कायापालट करण्यात येईल, अशी ग्वाही जीवनविद्या मिशनचे विश्वस्त आनंद राणे यांनी भिवपुरी (ता. कर्जत) येथे दिली.

कर्जत तालुक्यातील वैजनाथ परिसरात असलेल्या सद्गुरू वामनराव पै यांच्या जीवनविद्या मिशनच्या वतीने भिवपुरी गावामध्ये ग्रामसमृध्दी अभियान राबविण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने गावातील श्री दत्त मंदिर सभागृहात एका विशेष समारंभाचे आयोजन येथील करण्यात आले होते. त्यात आनंद राणे बोलत होते. या गावातील प्रत्येक कुटुंब, प्रत्येक व्यक्ती सुखी व्हावी. यासाठी आम्ही जीवनविद्या मिशनच्या माध्यमातून कार्य करणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

जीवनविद्या मिशनचे विश्वस्त मधुकर सरोदे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डोंबिवली शाखेच्या वृषाली दळवी यांनी प्रास्ताविक केले. सरपंच संगीता माळी यांच्या हस्ते नामफलकाचे अनावरण करण्यात आले. कोंकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन काळे, विजय मांडे, सचिन मुने, प्रवीण वाडला यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भावेश कचरे यांनी केले.भिवपुरीचे उपसरपंच हरिश्चंद्र मिसाळ, जीवनविद्या मिशनचे विश्वस्त मधुकर सरोदे, डोंबिवली शाखा सचिव सुमित शिगवण, प्रकाश कदम, प्रा. शिशुपाल बोधले, प्रशांत आचार्य, राजू शिगवण, लिलाधर किल्लेदार, प्रकाश सोळंकी, प्रल्हाद तुपे, दीपक सोळंकी, गुलाब भोसले, प्रमिला गायकवाड, सुश्मिता बार्शी, रेखा गोरे, मेघाली शिगवण, सुनिता किल्लेकर, शुंभांगी मंचेकर, अनिता मुंज, श्रुती पालव, नम्रता पालव, सुचिता शेडगे, विद्या बोडस, सुचिता पांढरपट्टे, किमया शिगवण आदींसह ग्रामस्थ या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जतमध्ये असंघटित कामगारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**कर्जत : बातमीदार**

राजर्षी शाहू महाराज जयंती दिनानिमित्त आधार असंघटीत जनरल कामगार युनियनच्या वतीने रविवारी (दि. २६) कर्जतमधील रायगड जिल्हा परिषदेच्या कन्या शाळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नामवंत डॉक्टरांनी असंघटित कामगारांची आरोग्य तपासणी केली.

राजर्षी शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून आधार असंघटीत जनरल कामगार युनियनच्या कार्यालयाचे उद्‌घाटन ॲड. मधुकर त्रिभुवन यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर घेण्यात आलेल्या शिबिरात डॉ. नरेंद्र गायकवाड, डॉ. निर्विदा गायकवाड, डॉ. प्रतिक कांबळी, डॉ. मयूर सरवदे, डॉ. सुनील ढवळे व डॉ. नेहा भालेराव यांनी असंघटीत कामगारांची मोफत आरोग्य तपासणी केली. त्यानंतर ॲड. त्रिभुवन यांनी कामगार कायदेविषयक मार्गदर्शन केले.

युनियनचे अध्यक्ष ॲड. कैलास मोरे, उपाध्यक्ष हरिचंद्र यादव, सरचिटणीस विद्यानंद ओव्हाळ, खजिनदार प्रसाद कांबळे, उपखजिनदार डॉ. सुनिल ढवळे, सदस्य शरद गायकवाड, दर्शना पवार, संतोष जाधव, शरद गायकवाड, संजय तिखंडे, द. बा. जाधव, सुनिल सोनावणे, धर्मेंद्र मोरे, अशोक कदम, अनंता गायकवाड, डोंगरे, प्रदीप ढोले, कमलाकर जाधव, विकी जाधव, राजू ढोले, लोकेश यादव, वैभव कांबळे, भगवान जाधव, नगरसेवक उमेश गायकवाड आदि या वेळी उपस्थित होते.



(छाया : संतोष पेरणे)

# पोलादपुरातील रानबाजिरे धरणाची साठवण क्षमता वाढण्यासाठी बॅकवॉटर केले टप्प्याटप्प्याने रिकामे

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील रानबाजिरे धरण गेल्या वर्षी ओव्हरफ्लो होऊन वाहू लागले होते. या पार्श्वभूमीवर हे धरण उशिराने भरावे, यासाठी गेल्या महिन्यापासून धरणातील पाणी सावित्रीत सोडले जात आहे. त्यामुळे नदीपात्रातील वाळू वाहून गेल्याने अवैध वाळू उपसा करणाऱ्यांची धांदल उडाल्याचे दिसून येत आहे.



(छाया : शैलेश पालकर)

वाळू वाहून गेल्याने अवैध उपसा करणाऱ्यांची धांदल

पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धरणातील पाण्याची पातळी गेल्या वर्षी २२ जुलै २०२१ रोजी चक्क ५७.६० मीटर एवढी वाढून होती. ती रातोरात धोक्याच्या पातळीपर्यंत पोहोचण्याची वेळ आली होती. या अनुषगाने यंदा रानबाजिरे धरणातील बॅकवॉटर मे महिन्यापासून सावित्री नदीपात्रात सोडण्यात येत आहे. त्यामुळे पाऊस सुरू होण्याआधी धरणातील पाण्याची पातळी खूप खाली जावून अतिवृष्टीकाळात धरणातील पाणी धोक्याची पातळी ओलांडणार नाही, असा प्रशासनाचा हेतू होता. रानबाजिरे धरणातील बॅकवॉटर सोडल्याने दिविल ते सवाद गावांतील सावित्री नदी पात्रात वाळू, रेजगा तसेच दगड-गोट्यांचा उपसा करणाऱ्यांनी काढून ठेवलेली वाळू सर्वात आधी वाहून गेली. त्यामुळे नदीपात्रात दगड-गोटे-रेजगा यांचा अवैध उपसा करणाऱ्यांनी महाड एमआयडीसी अभियंत्यांच्या नावाने शंख करण्यास सुरूवात केली. दरम्यान, रानबाजिरे धरणाच्या बॅंकवॉटरचे क्षेत्र जवळपास ७५ टक्के रिकामे झाले असल्याने यंदा धरण भरण्यास गेल्या वर्षीपेक्षा अधिक कालावधी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रानबाजिरे धरणातील पाणी मे महिन्यापासून सातत्याने सोडल्याने सावित्री नदीत पुरसे पाणी होते. त्यामुळे नदी लगतच्या गावांमध्ये कपडे व भांडी धुण्यासाठी तसेच अन्य कामासाठी पाण्याची कमतरता जाणवली नाही.

# मेक कळसगिरी मोअर ग्रीन उपक्रम यंदा ३ जुलैला; अनेक संस्था होणार सहभागी

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील कळसगिरीला अधिक हिरवेगार करण्याच्या दृष्टीने रोह्यातील सामाजिक संस्था एकत्र येऊन 'मेक कळसगिरी मोअर ग्रीन' हा उपक्रम दरवर्षी राबवत असतात. यावर्षी हा उपक्रम रविवारी (३ जुलै) राबवला जाणार असल्याची माहिती आयोजक संस्थांनी दिली आहे.

मेक कळसगिरी मोअर ग्रीन या उपक्रमाअंतर्गत मागील वर्षी ६ जूनला १२५ हून अधिक जणांनी प्रत्येकी दीडशे बियांचे रोपण केले होते. त्यापैकी १५ ते २० टक्के बिया रुजल्याचे वन विभागाकडून सांगण्यात आले. गेल्या वर्षीपेक्षा यंदा पाऊस उशिरा सुरू झाल्याने यंदा ३ जुलैला हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमात लायन्स क्लब, रोटरी क्लब रोहा, रोटरी क्लब रोहा सेंट्रल, सृष्टी प्रतिष्ठान, ब्राम्हण मंडळ, मेहेंदळे विद्या संकूल शिक्षक वृंद, सी. डी. देशमुख महाविद्यालय या संस्था सहभागी होणार आहेत.

मेक कळसगिरी मोअर ग्रीन या उपक्रमात अधिकाधिक रोहेकरांनी, कळसगिरी प्रेमींनी व निसर्ग प्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक संस्थांनी केले आहे.

# विघवली हायस्कूलमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

दहावीच्या परीक्षेत विघवली हायस्कूलमध्ये पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थीनींचा विघवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांच्या प्रमुख उपस्थितीत भेटवस्तू बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.

माणगाव तालुक्यातील विघवली हायस्कुलचे चेअरमन नामदेव शिंदे यांनी आपले बंधू कै. आदिप शिंदे व पत्नी कै. उषा शिंदे यांच्या स्मरणार्थ संस्थेकडे ३० हजार रुपये ठेव जमा केली असून, त्या रकमेच्या मिळणाऱ्या व्याजातून हायस्कूलमध्ये दरवर्षी दहावीच्या परीक्षेत प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस दिले जाते. मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत विघवली हायस्कूलमध्ये श्रावणी निलेश आडीत हिने पहिला, समीक्षा राजेंद्र सालदूर हिने दूसरा आणि नेत्रा नरेश बक्कम हिने तिसरा क्रमांक मिळविला. त्यांचा नुकताच बक्षीस व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

शिक्षक कृष्णा पानावकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. संस्थेचे अध्यक्ष महादेवराव बक्कम, सचिव बा. द. बेंडखळे, स्कुल कमिटी चेअरमन नामदेव शिंदे, सदस्य चंद्रकांत उभारे, वसंत साठे, भागोजी ढाकवळ, हेमंत शेट, काशीराम वाढवळ, सहदेव बक्कम, यशवंत बक्कम, विजय धसाडे, नरेश बक्कम यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणगावात घरफोडी

## १५ हजार घेऊन अज्ञात चोरटा फरार

**माणगाव : प्रतिनिधी**

जुने माणगाव परिसरातील एका दुकानात रविवारी (दि. २६) मध्यरात्रीच्या सुमारास प्रवेश करून अज्ञात चोरट्याने गल्ल्यातील रोख रक्कम १५ हजार ३०० घेऊन पोबारा केला.



रामजीलाल चतराजी माली यांच्या मालकीचे जुने माणगाव परिसरात महादेव स्टील बिल्डिंग मटेरिअल नावाचे दुकान आहे. या दुकानाच्या गेटवरून उडी मारून अज्ञात चोरट्याने दुकानात प्रवेश केला व लोखंडी कैचीच्या सहाय्याने गल्ल्याचे कुलूप तोडून १५ हजार ३०० रुपये रोकड लांबविली.

या प्रकरणी रामजीलाल माली यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माणगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस नाईक श्री. खिरीट करीत आहेत.

# उकरूळ गावात कृषी संजीवनी सप्ताह; शेतकऱ्यांचा प्रतिसाद

**कर्जत : बातमीदार**

एसआरटी, चारसूत्री लागवड पद्धत तसेच ड्रमसिडरसारख्या नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतकऱ्यांनी भात पिकाचे उत्पादन वाढवावे, असे आवाहन कर्जत तालुका कृषी अधिकारी शीतल शेवाळे यांनी उकरूळ येथे केले.

कृषी संजीवनी सप्ताहाचे निमिताने कर्जत तालुक्यातील उकरूळ ग्रामपंचायत आणि तालुका कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गावातील मंदिरात शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात तालुका कृषी अधिकारी शीतल शेवाळे मार्गदर्शन करीत होत्या. शेतकऱ्यांना भात पिक लागवडीसाठी शेतकऱ्यांनी योग्य तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे त्यांनी या वेळी सांगितले.

सरपंच वंदना थोरवे यांनी सर्वांचे स्वागत केले. तालुका कृषी अधिकारी अनुराधा अंधारे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. शिबिरात ३५ शेतकरी सहभागी झाले होते.





# कर्जतमधील चार शिक्षक राज्य पुरस्काराने सन्मानित

**कर्जत : प्रतिनिधी**

दाहिवली येथील जनता विद्या मंदिर प्रशालेच्या मुख्याध्यापकांसह कर्जत तालुक्यातील चार शिक्षकांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

क्रीडा संस्कृती फाउंडेशनच्या राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन नुकताच नाशिक येथे करण्यात आले होते. या सोहळ्यात कर्जत तालुक्यातील दहिवली येथील जनता विद्या मंदिर प्रशालेचे मुख्याध्यापक महादेव क्षीरसागर, राजश्री केदार, वैशाली नेमाडे आणि गीते यांना अर्जुन पुरस्कार प्राप्त अशोक ध्यानचंद यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

शिवछत्रपती पुरस्कार विजेते अशोक दुधारे, मुंबई हॉकी असोशिएशनचे सचिव रणबीर सिंग, राष्ट्रीय पंच रणजित सिंग , टेनिस-व्हॉलीबॉल असोशिएशनचे अध्यक्ष शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आनंद खरे, दीपक निकम, प्रा. डॉ रणमाळे या वेळी उपस्थित होते.

# यंग इंडियाची विजयी सलामी

## पहिल्या टी-२०मध्ये आयर्लंडवर विजय

**डब्लिन : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या ट्वेन्टी-२० सामन्यात विजय मिळवला. पावसाच्या व्यत्ययामुळे ही लढत १२-१२ षटकांची खेळवण्यात आली आणि त्यात हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने सहज बाजी मारली.

आयर्लंडच्या हॅरी टेक्टरने दमदार खेळ करून भारतासमोर आव्हानात्मक लक्ष्य उभे केले होते, पण भारताच्या फलंदाजांनी त्यांना सडेतोड उत्तर दिले. इशान किशनने आक्रमक सुरुवात करून दिल्यानंतर अन्य फलंदाजांची चोख भूमिका बजावली. त्यानंतर दीपक हुडा व हार्दिक पांड्या यांनी सुरेख खेळ करताना भारताचा विजय पक्का केला.



भुवनेश्वर कुमारने पाचव्या चेंडूवर अँडी बालबर्नीचा (०) त्रिफळा उडवला. दुसऱ्या षटकात हार्दिक पांड्याने टाकलेला पहिला चेंडू पॉल स्टर्लिंगने कव्हरच्या दिशेने सीमापार पाठवला. पुढचा चेंडूवर त्याने उत्तुंग फटका मारला, पण दीपक हुडाने अलगद झेल घेतला. आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये पॉवर प्लेमध्ये सर्वाधिक ३४ विकेट्स घेण्याचा विक्रम भुवीच्या नावे नोंदवला गेला आहे, तर आंतरराष्ट्रीय टी-२०त गोलंदाजी करणारा आणि विकेट मिळवणारा हार्दिक भारताचा पहिलाच कर्णधार ठरला.

पदार्पणवीर उम्रान मलिकने पहिल्या षटकात १४ धावा दिल्या. आयर्लंडच्या हॅरी टेक्टर व लोर्कन टकर यांनी २९ चेंडूंत अर्धशतकी भागीदारी करताना टीम इंडियाला टफ फाईट दिली. टकर (१८) व टेक्टर यांची २९ चेंडूंतील ५० धावांची भागीदारी युजवेंद्र चहलने संपुष्टात आणली. चहलने त्याच्या तीन षटकांत ११ धावा देताना एक विकेट घेतली. भुवीनेही ३-१-१६-१ अशी कामगिरी केली. टेक्टरने ३३ चेंडूंत सहा चौकार व तीन षटकारांसह नाबाद ६४ धावा केल्या. आयर्लंडने चार बाद १०८ धावा केल्या. हार्दिकने २-०-२६-१, आवेश खानने २-०-२२-१ अशी गोलंदाजी केली.

दीपक हुडा व इशान किशन ही जोडी सलामीला आली. इशानने पहिल्याच षटकात ४, ६, ४ अशा १४ धावा चोपल्या. इशानने फॉर्म कायम राखताना २०२२मध्ये आयसीसीच्या पूर्ण सदस्य असलेल्या संघांमध्ये टी-२०त ४०० धावा करणाऱ्या पहिल्या फलंदाजाचा मान पटकावला. तिसऱ्या षटकात क्रेग यंगने इशानचा त्रिफळा उडवला. त्यानंतर आलेला सूर्यकुमार यादव गोल्डन डकवर बाद झाला. त्याने घेतलेला रिव्ह्युही वाया गेला.

यानंतर दीपक हुडाने फटकेबाजीला सुरुवात केली. दीपक व हार्दिक यांनी अँडी मॅकब्रीनने टाकलेल्या सहाव्या षटकात २१ धावा चोपल्या. इथे आयर्लंडच्या हातून सामना निसटला. या जोडीने २८ चेंडूंत अर्धशतकी भागीदारी पूर्ण केली. आठव्या षटकात हार्दिक (२४) बाद झाला अन् दीपकसह त्याची ६४ धावांची भागीदारी संपुष्टात आली. मग दिनेश कार्तिक व दीपक यांनी भारताचा सात विकेट्स राखून विजय पक्का केला.

# तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला संघाला रौप्यपदक

**पॅरिस : वृत्तसंस्था**

दीपिका कुमारी, सिमरनजीत कौर आणि अंकिता भकत या भारतीय महिला रिकर्व्ह त्रिकुटाचा तिरंदाजी विश्वचषकाच्या रविवारी (दि. २६) झालेल्या सुवर्णपदकाच्या लढतीत चायनीज तैपेईच्या संघाकडून १-५ असा पराभव झाला. त्यामुळे त्यांना या स्पर्धेच्या तिसऱ्या टप्प्याच्या अंतिम दिवशी रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.



चायनीज तैपेईच्या लेई चियान-यिंग, पेंग चिया-माओ आणि कुओ त्झू यिंग या त्रिकुटाने तिसऱ्या सेटमध्येच सामना संपवताना १६८-१५३ अशा एकतर्फी फरकासह विजय मिळवला. चायनीज तैपेईने पहिला सेट ५६-५३ने जिंकला, तर १३व्या मानांकित भारतीयांनी दुसरा सेटमध्ये ५६ गुण घेताना बरोबरी साधण्यासाठी दोन गुणांचा दावा केला. तैपेईच्या त्रिकुटाने मात्र तिसऱ्या सेटमध्ये सातत्य राखताना ५६-५३ असे गुण घेत १-५ अशी अभेद्य आघाडी घेतली आणि सुवर्णपदक जिंकले.

गेल्या २४ तासांच्या अंतरात भारताचे हे तिसरे पदक होते, कारण याआधी भारताने कंपाउंड तिरंदाजांनी मिश्र सांघिक आणि महिला वैयक्तिक अंतिम फेरीत अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्य पदक जिंकले होते. पुढे ढकलण्यात आलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी वगळण्यात आल्यापासून पुनरागमनाच्या मार्गावर असणारी ज्योती सुरेखा वेन्नम चांगल्या फॉर्ममध्ये परतली आहे, कारण तिने प्रथम अभिषेक वर्मासोबत सुवर्णपदकासह नंतर महिलांच्या वैयक्तिक अंतिम फेरीत रौप्यपदक पटकावून आपली चुणूक दाखवली आहे. सहा सुवर्णांसह पदकतालिकेत अव्वल असलेल्या पॉवरहाऊस दक्षिण कोरियानंतर, भारत आपल्या तीन पदकांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

### रोहितसाठी बीसीसीआयचा बॅकअप प्लॅन

# मयांक इंग्लंडसाठी रवाना

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारताचा सलामीवीर मयांक अग्रवाल इंग्लंडला रवाना झाला असून तो भारतीय कसोटी संघात सामील होणार आहे. रोहित शर्मा कोरोना पॉझिटिव्ह आढळून आल्याने बीसीसीआयने मयांकला त्याचा बॅकअप म्हणून इंग्लंडला पाठवले आहे. भारत इंग्लंड यांच्यातील एकमेव कसोटी सामना १ जुलैपासून सुरू होणार आहे.

लिसेस्टरशायर विरूद्धच्या सराव सामन्यात पहिल्या दिवशी रोहित शर्माने फलंदाजी केली, मात्र त्यानंतर त्याची रॅपिड अँटिजेन टेस्ट पॉझिटिव्ह आल्याने त्याला विलगीकरणात ठेवण्यात आले. रोहित १ जुलैपर्यंत फिट होण्याची शक्यता असली तरी बीसीसीआयने ३१ वर्षांच्या मयांक अग्रवालला इंग्लंडला रवाना केले आहे. मयांकला इंग्लंडविरूद्धचा कसोटी संघ जाहीर झाला, त्या वेळी संघात स्थान मिळाले नव्हते, मात्र आधी केएल राहुलला झालेली गंभीर दुखापत आणि त्यानंतर रोहित शर्मा कोरोना पॉझिटिव्ह आढळून आल्याने मयांकची संघात वर्णी लागली.

बीसीसीआयने पीटीआयला दिलेल्या माहितीनुसार, मयांक अग्रवाल इंग्लंडसाठी रवाना होत आहे. तो रोहितचा बॅकअप म्हणून संघात असेल. गरज लागली तर तो इंग्लंडविरूद्धच्या कसोटी सामन्यातदेखील खेळेल. युकेमध्ये सध्या कोरोनाविषयक खबरदारीचे नियम लागू करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे मयांकची आरटीपीसीआर टेस्ट निगेटिव्ह आली, तर त्याला विलगीकरणात राहावे लागणार नाही.

## इंग्लंडच्या संघातही कोरोनाचा शिरकाव

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यामध्ये १ जुलैपासून एकमेव कसोटी सामना होणार आहे. हा सामना सुरू होण्यापूर्वीच भारताचा कर्णधार रोहित शर्मा सराव सामन्यादरम्यान कोरोनाग्रस्त झाला. आता न्यूझीलंडविरूद्ध शेवटची कसोटी खेळत असलेल्या इंग्लंडचा विकेटकिपर बेन फोक्सला कोरोनाची लागण झाली आहे.

याबाबतची माहिती इंग्लंड क्रिकेट बोर्डाने ट्विट करून दिली. यष्टीरक्षक फलंदाज बेन फोक्सचा कोरोना चाचणी अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. त्याच्या जागी आता रिप्लेसमेंट म्हणून सॅम बिलिंग्जचा समावेश करण्यात आला आहे. इसीबीने फोक्स संघात कधी परतणार याबाबतची माहिती योग्य वेळी दिली जाईल. अशी आशा आहे की, तो भारताविरूद्धच्या कसोटी सामन्यापूर्वी बरा होईल, असे वक्तव्य प्रसिद्ध केले आहे.

# मध्य प्रदेशच्या यशात चौघे चमकले

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

रणजी करंडक स्पर्धेच्या अंतिम सामन्यामध्ये मुंबईचा सहा गडी राखून पराभव केल्यानंतर मध्य प्रदेशने प्रथमच रणजी विजेतेपद पटकाविले. कर्णधार आदित्य श्रीवास्तवच्या संघाने इतिहास रचला. या विजयात रजत पाटीदार, यश दुबे, शुभम शर्मा आणि कुमार कार्तिकेय या खेळाडूंनी सर्वाधिक योगदान दिले.

बंगळुरुतील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर रंगलेल्या रणजी करंडकाच्या अंतिम सामन्यात मध्य प्रदेश संघातील शुभम शर्मा, यश दुबे आणि रजत पाटीदार या त्रिकूटाने चमकदार कामगिरी केली. तिघांच्या शतकी खेळीच्या बळावर मध्य प्रदेशला पहिल्याच डावात आघाडी घेता आली. शुभम शर्मा या रणजी हंगामात धावांच्या बाबतीत पाचव्या क्रमांकावर राहिला. त्याने सहा सामन्यांच्या नऊ डावात ६०८ धावा केल्या.



यश दुबे या रणजी हंगामात मध्य प्रदेशसाठी सर्वाधिक धावा करणारा दुसऱ्या क्रमांकाच फलंदाज ठरला आहे. त्याने सहा सामन्यांतील १० डावांत ६१४ धावा केल्या. अंतिम सामन्यात यशने १३३ धावांची जबरदस्त खेळी खेळून मुंबईच्या गोलंदाजांचे मनोधैर्य तोडले. शुभम आणि यशला रजत पाटीदारने खंबीर साथ दिली. आयपीएल २०२२मध्ये बंगळुरूसाठी त्याने बाद फेरीत शतक झळकावून सर्वांचे लक्ष वेधले होते. रणजी स्पर्धेतही त्याने अप्रतिम फलंदाजी केली आणि धावांच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर राहिला. त्याने सहा सामन्यांतील नऊ डावांत ६५८ धावा केल्या.

मध्य प्रदेशच्या गोलंदाजांनीदेखील विजयात योगदान दिले आहे. या रणजी हंगामात सर्वाधिक बळी घेण्याच्याबाबतीत मध्य प्रदेशचा कुमार कार्तिकेय दुसऱ्या क्रमांकावर राहिला. त्याने एका डावात सहा बळी घेण्याचा पराक्रमही केला. कार्तिकेयने अंतिम सामन्यात मुंबईच्या पाच महत्त्वाच्या खेळाडूंना बाद केले. कर्णधार आदित्य श्रीवास्तव आणि प्रशिक्षक चंद्रकांत पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी चांगली कामगिरी केली.

## मध्य प्रदेशच्या विजयानंतर मुख्यमंत्र्यांनी केला जल्लोष

**भोपाळ : वृत्तसंस्था**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मध्य प्रदेशच्या संघाने ऐतिहासिक विजय मिळवला. रणजी स्पर्धेच्या इतिहासामध्ये मध्य प्रदेशने पहिल्यांदाच विजेतेपद पटकाविले आहे. त्यामुळे विजेत्या संघावर सर्व क्षेत्रांतील मान्यवरांनी आणि चाहत्यांनी अभिनंदनाचा वर्षाव सुरू केला आहे. यामध्ये मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांचाही समावेश आहे.

शेवटच्या दिवशी मुंबईने मध्य प्रदेशच्या संघासमोर विजयासाठी १०८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. जे मध्य प्रदेशच्या संघाने २९.५ षटकांतच पूर्ण केले. यश दुबे, शुभम शर्मा आणि रजत पाटीदार हे मध्य प्रदेशच्या विजयाचे शिल्पकार ठरले. सामना अंतिम टप्प्यात आल्यापासून मुख्यमंत्री सामन्याकडे लक्ष ठेवून होते. आपल्या संघाने विजय मिळवताच चौहान यांनी हेलिकॉप्टरमध्ये जल्लोष केला.

या विजयाबद्दल मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आपल्या संघाचे अभिनंदन केले आहे. रणजी करंडक २०२२च्या अंतिम सामन्यात मध्य प्रदेशच्या संघाने केवळ नेत्रदीपक विजयच मिळवला नाही, तर लोकांची मनेही जिंकली. या अभूतपूर्व विजयाबद्दल मध्य प्रदेश संघाचे हार्दिक अभिनंदन. तुमची ही विजयी घोडदौर अशीच अखंडपणे सुरू राहो, यासाठी शुभेच्छा, असे ट्वीट त्यांनी केले आहे.

# लिसेस्टरशायरविरुद्धचा सराव सामना अनिर्णित

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाचव्या कसोटी सामन्यापूर्वी चार दिवसांचा एक सराव सामना खेळवण्यात आला. लिसेस्टरशायर क्रिकेट क्लब आणि भारतादरम्यान झालेला हा सराव सामना अनिर्णित राहिला.

सामन्याच्या चौथ्या दिवशी लिसेस्टरशायरला विजयासाठी ३६७ धावा करायच्या होत्या. दिवसाचा खेळ संपेपर्यंत त्यांना चार बाद २१९ धावांपर्यंत मजल मारता आली. ६६ षटकांनंतर दोन्ही कर्णधारांनी सामना बरोबरीत सोडण्यासाठी सहमती दिली. दुसऱ्या डावात लिसेस्टरशायरकडून शुबमन गिलने सर्वाधिक ६२ धावा केल्या, तर भारताकडून रविचंद्रन अश्विनने दोन बळी घेतले. याशिवाय विराट कोहलीने दोन्ही डावांमध्ये दमदार खेळी करीत फॉर्ममध्ये परतल्याचे संकेत दिले आहेत.



भारतीय संघातील सर्व खेळाडूंना सरावाची संधी मिळावी यासाठी काही भारतीय खेळाडू लिसेस्टरशायरच्या संघाकडून खेळले. भारताने पहिल्या डावात आठ बाद २४६ धावा केल्या होत्या. यानंतर लिसेस्टरशायरचा पहिला डाव २४४ धावांत आटोपला. त्यानंतर भारताने आपला दुसरा डाव सात बाद ३६४ धावांवर घोषित केला. अशा प्रकारे लिसेस्टरशायरला विजयासाठी ३६७ धावांचे लक्ष्य मिळाले होते.

दुसऱ्या डावात शुभमन गिलने ७७ चेंडूत ६२ धावा केल्या. त्याला अश्विनने त्रिफळाचित केले. कोरोनामुळे अश्विन या सामन्यात खेळत नव्हता, पण शेवटच्या दिवशी त्याला सरावाची संधी देण्यात आली होती.

भारताकडून दुसऱ्या डावात माजी कर्णधार विराट कोहलीने ६७ धावा केल्या. श्रेयस अय्यरने ६२ आणि रवींद्र जडेजाने नाबाद ५६ धावा केल्या. पुजारा लिसेस्टरशायर संघात होता, पण त्याने सरावासाठी भारतीय संघाकडूनही फलंदाजी केली. शुभमन गिलच्या बाबतीतही तेच झाले. गिल भारताच्या संघात होता, पण त्याने दुसऱ्या डावात लिसेस्टरशायरसाठीही सलामी दिली.

भारत आणि इंग्लंड यांच्यात एजबस्टनमध्ये १ ते ५ जुलैदरम्यान पाचवा कसोटी सामना होणार आहे. भारतीय संघ गेल्या वर्षी ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये इंग्लंड दौऱ्यावर गेली होती. चार कसोटी सामन्यांमध्ये भारतीय संघ २-१ने पुढे होता, तर कोरोनामुळे पाचवा सामना होऊ शकला नव्हता. तो आता होणार आहे.

## वसीम जाफरकडून प्रशिक्षक चंद्रकांत पंडित यांचे अभिनंदन

**मुंबई : प्रतिनिधी**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्याचा निकाल लागल्यानंतर माजी भारतीय क्रिकेटपटू वसीम जाफरने ट्वीट करून विजेत्या संघाला आणि प्रशिक्षकांना आपल्या शैलीत शुभेच्छा दिल्या.

मध्य प्रदेशच्या संघाने प्रशिक्षक चंद्रकांत पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आपले पहिले रणजी विजेतपद पटकाविले. त्यांचे अभिनंदन करण्यासाठी वसीम जाफरने खास ट्वीट केले, चंदू भाई, तुम्हाला मानले, अगोदर मुंबई, नंतर विदर्भ आणि मध्य प्रदेश, हे अतुल्य आहे! जेव्हा करंडक जिंकण्याचा प्रश्न येतो तेव्हा तुम्ही सर्वोत्कृष्ट प्रशिक्षक ठरता. कर्णधार आदित्य श्रीवास्तव, मध्य प्रदेशचा संघ आणि सहाय्यक कर्मचारी, असे सर्वांचे अभिनंदन!



स्पर्धेच्या ८८ वर्षांच्या इतिहासात मध्य प्रदेशने दुसऱ्यांदाच अंतिम फेरी गाठली होती. अंतिम सामन्यात चमकदार कामगिरी करीत मध्य प्रदेशच्या संघाने मुंबईचा पराभव केला. याचे सर्वाधिक श्रेय प्रशिक्षक चंद्रकांत पंडित यांना जाते, जे एकेकाळी मुंबई संघाचे एक भाग होते.



**मुंबई, पनवेल : भाजप किसान मोर्चाचे कोकण संपर्क प्रमुख सुनील गोगटे (कर्जत) यांनी दहावी-बारावीनंतर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी 'पाऊलवाटा करिअरच्या' ही मार्गदर्शक पुस्तिका तयार केली आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या हस्ते करण्यात आले, तसेच या पुस्तिकेची प्रत भाजप प्रदेश उपाध्यक्ष आमदार प्रसाद लाड आणि भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना देण्यात आली. सोबत पदाधिकारी आणि कार्यकर्ते.**








हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अ‍ॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अ‍ॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**